
दिनानाथ मनोहर

# आमू आहिं वाघा पिल



**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# आमु आहिं वाघा पिल

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# आमु आहिं वाघा पिल

लेखक

## दिनानाथ मनोहर

# आमु आहिं वाघा पिल

## लेखक... दिनानाथ मनोहर

पत्ता- अवकाश, ३२ वागेश्वरीनगर, नंदुरबार-४२५४१२
फोन नम्बर : ९४०३४२२६२७
ई मेल : dinamanohar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : ६ जानेवारी २०२१**




©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

णे आवश्यके◌आहे.

# दिनानाथ मनोहर



दिनानाथ मनोहर वयाची ऐंशी वर्षं ओलांडलेले एक तरूण लेखक आहेत. त्यांना पाहून वा त्यांच्या लेखनाचा, समाजकार्याचा व इतर कामाचा झपाटा बघून त्यांच्या वयाचा पत्ता लागत नाही.

यात जसा त्यांच्या चष्मा न लावण्याचा भाग आहे, तेवढाच त्यांनी आदिवासींबरोबर जगलेल्या मुक्त पर्यावरणाचा आणि त्यांच्या कायम नाविन्याचा शोध घेणाऱ्या उत्साही, तंत्रस्नेही, प्रागतिक विचारांचाही आहे.

तसे ते पन्नासहून अधिक वर्षे लिहीत आहेत. १९७५ साली ग्रंथाली प्रकाशनावर रोबो ही कादंबरी प्रकाशित करून ते साहित्य क्षेत्रात उभे राहिले. ते पन्नास वर्षे लिहीतच आहेत. अनेक

नियतकालिके व सामाजिक चळवळींसाठी त्यांचे साहित्यिक योगदान फ़ार मोठे आहे. वयाची आठ दशके उलटल्यावरही ते तरूणांच्या विविध उपक्रमांत भाग घेत असतात.

कबीरा खडा बाजार में(लोकवाङ्मय गृह), मन्वंतर(राजहंस प्रकाशन), प्रदेश साकल्याचा (मुद्रा), आंदोलन, सीमांत(ग्रंथाली). रोबो(शब्द प्रकाशन), फत्ते तोरणमाळ या कादंबऱ्यांसह त्यांची डझनाहून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मराठीतील लेखकांसाठीचा जीवनगौरव मानला जाणारा “भाऊ पाध्ये पुरस्कार” त्यांना लाभला आहे. त्यांच्या अनेक पुस्तकांना मोठमोठ्या पुरस्कारांनी गौरवले गेले आहे.

त्यांचा “जगावेगळया” हा विज्ञानकथासंग्रह लवकरच येत आहे. सुमारे पन्नास वर्षांची त्यांची लेखणी आताही सातत्यपुर्ण नवनिर्मिती करत असते.

प्रस्तुत पुस्तकातील लेखमालिका त्यांनी १९८० साली लिहीली व प्रसिद्ध केली असून ते ईपुस्तकरुपाने ई साहित्यवर प्रथमच येत आहे.

# आमु आहिं वाघा पिल

दिनानाथ मनोहर



# प्रस्तावना

प्रिय वाचक

आदिवासी जंगल परिषदेच्या निमित्ताने लिहिलेल्या ह्या पुस्तिकेत बऱ्याच उणिवा आहेत. ज्या आदिवासी वीरांचा येथे उल्लेख झाला आहे, त्यांच्याबाबत आणखी बरीच माहिती देता आली असती, ज्यांचा उल्लेख झाला नाही असे अनेक आदिवासी वीर स्त्री-पुरुष होऊन गेले आहेत. ह्याशिवाय आदिवासी जमातींनी दिलेल्या संघर्षांची बरीच माहिती उपलब्ध असूनही ह्या पृस्तिकेत आलेली नाही. पुस्तिकेतील अशा दोषांबद्दल मी दिलगीर आहे.

ही पुस्तिका लिहीत असतांना अनेक लेखकांनी केलेल्या संशोधनपर केलेल्या लेखनाचा व लेखांचा मी उपयोग केला आहे. ह्या सर्वांचा नामोल्लेख करणे कठीण आहे. परंतु हे सर्व ह्या पुस्तिका लेखनात सहभागी होते असे मी मानतो.

ही पुस्तिका एक सुरुवात आहे हे लक्षात घेऊन आपण मला क्षमा कराल अशी खात्री आहे. ही एक सुरुवात आहे असं मी अशा अर्थाने म्हणतो की, ह्यापुढे अनेक सुशिक्षित आदिवासी युवक-युवती भूतकाळाच्या जंगलात दडलेला आदिवासींचा इतिहास प्रकाशात आणतील, एकेका आदिवासी वीराच्या संघर्षांच्या

कहाण्या लिहीतील, स्त्रीयांच्या धाड्शीपणाच्या कथा सांगतील, आदिवासींचा इतिहास हा चमकदार आहे. हे जगाला दाखवून देतील असा मला विश्वास आहे. आणि हा विश्वास व्यक्त करूनच ही पुस्तिका मी आपणास सोपवत आहे.

दिनानाथ मनोहर

मे- १९८०

## आपण सवे आदिवासी

भारत देशातील एकूण लोक संख्येच्या ७. ८ टक्के लोक आदिवासी आहेत. वेगळ्या शब्दात सांगायचे तर शंभर भारतीयांतील आठ भारतीय आदिवासी जमातीचे आहेत. भारतातील बहुतेक सर्व राज्यात आदिवासी आढळतात, पण सर्व समाजात हे सारखे विखुरलेले नाहीत. भारताच्या नकाशाकडे पाहिले तर आदिवासींची वस्ती काही भागातच केन्द्रीत झालेली दिसते. भारताच्या अश्याच कोपऱ्यापासून म्हणजे आसामपासून वायव्येकडे कर्नाटक पर्यन्त एक पट्टाच असा आहे की जेथे आदिवासी बहुसंख्येने आहेत. ह्या पट्टयात ज्या काही प्रमख आदिवासी जमाती आहेत. त्यातील एक प्रमुख जमात आहे आपली भील जमात. महाराष्ट्र, गुजराथ, मध्यप्रदेश आणि राजस्थान ह्यांच्या सीमा प्रदेशात आज आपल्याला पावरा, भीलोला, दुबळा, धानका, मंथवाडी, कोंकणी, वारली, डांगी अश्या अनेक आदिवासी जमाती दिसत असल्या तरी ह्या सर्वे जमाती एकाच मूळ जमातीच्या पोट जमाती आहेत. आणि ही मुळ प्रमूख जमात आहे भील जमात.

आज ह्या जमाती आपापल्या बोली भाषां बोलतात, ह्या भाषांमध्ये थोडा थोडा फरकही आहे. ह्या भाषांमध्ये संस्कृत मधून

निर्माण झालेल्या गुजराथी, मराठी, राजस्थानी, हिन्दी भाषेचे शब्द आढळतात, पण मुळात ह्या सर्व पोट भाषा एकाच मुळ भाषेतून जन्मल्या आहेत आणि ही मुळ मायभाषा आहे भिलोरी,

भिलोरी भाषा मुळात कुठे जन्मली हे सांगणे फार कठीण आहे. भिलोरी भाषेत बिहार, उत्तर प्रदेश ह्या भागात असलेल्या मुंडा जमातीच्या मुळ मुंडी. भाषेचे शब्द आढळतात आणि ह्या भाषेची रचना ही द्रविड भाषांशी मिळती-जुळती आहे. आता ह्या भाषेत संस्कृत मधून जन्मलेल्या भाषांचे अनेक शब्द आढळत असले तरी एक गोष्ट निश्चित आहे; भिलोरी भाषा संस्कृत मधून जन्माला आलेली नाही. अनेक लोक; अनेक वर्षांपासून, अनेक शतकांपासून भिलोरी भाषा बोलत असले तरी ह्या भाषेला आपली स्वतःची लिपी नाही. पण ह्यात काही आश्चर्य नाही. कोणतीही भाषा प्रथम बोली भाषाच असते कालान्तराने ही भाषा बोलणाऱ्यांना आपल्या भाषेला लिपी असावी अशी गरज वाटते. आणि मग भाषेला लिपी निर्माण होते. भाषेला लिपी असणे फार फायद्याचे असते, भाषेला लिपी असली की ती भाषा बोलणारे लोक आपल्या आठवणी, आपले विचार आपल्या भाषेत लिहून ठेवतात, ती भाषा बोलणाऱ्यांचे जीवन आपल्याला त्यांनी लिहून ठेवलेल्या साहित्यातून कळते. ती भाषा बोलणाऱ्या लोकांना कुठल्या अडचणींना तोंड द्यावे लागले त्यांनी ह्या अडचणीशी कसा

सामना दिला, त्यांच्यातील शूर माणसांनी कशाप्रकारे लढाया दिल्या इत्यादी गोष्टी मग लिखित स्वरुपात जतन केल्या जातात; थोडक्यात ज्या भाषेला लिपी असेल ती भाषा बोलणाऱ्यां लोंकांचा इतिहास लिहिला जातो. पुढील पिढ्यांना आपल्या बापजाद्यांनी काय केले हे समजते. भिलोरी भाषेला लिपी नसल्याने आपला इतिहास लिखीत स्वरुपात सापडत नाही.

पण याचा अर्थ सर्व इतिहास पुसला गेला आहे असे मात्र नाही. आपल्या लोककथातून दंतकथातून आपला इतिहास लपलेला आहे. काही वर्षापुर्वीपर्येन्त, राजस्थान मेवाड भागातून भाट लोक यायचे या लोकांना आपला इतिहास माहीत असायचा, गाणी आणि कहाण्या यातून ते आपल्या बापजाद्यांचा इतिहास सांगायचे. आपला इतिहास शोधण्याचा आणखीही एक रस्ता आहे. ज्यांना लिपी होती त्या भाषा बोलणाऱ्यांनी आपल्या संबंधी काय लिहून ठेवले आहे ते पाहून त्यातूनही आपला इतिहास आपल्याला समजतो.

पण यातही अडचण आहे. आपण आदिवासी पूर्वीपासून इतर. लोकांपासून आपण दूरच राह्यचो. डोंगर, दऱ्या टेकडया, दाट जंगले यांनी व्यापलेल्या प्रदेशात आपण राह्यचो. आपली भाषा वेगळी, आपली जीवनपद्धती वेगळी त्यामुळे आपला बिगर आदिवासी लोकांशी संबंध क्वचितच यायचा. आणि जो संबंध यायचा तोही

फार जवळचा नसायचा. त्यामुळे त्यांनी आपल्याबद्दल जे काही लिहिले आहे, आपल्या बापजाद्यांबद्दल लिहीले आहे, ते अपुऱ्या माहितीच्या आधारावर, गैरसमजूतीच्या आधारावर लिहिले आहे . पण आपल्याला आपण कोण आहोत हे समजण्यासाठी आपला इतिहास, आपल्या बापजाद्यांचा इतिहास माहित असायलाच पाहिजे. एखाद्या माणसाच्या डोक्यात त्याच्या लहानपणापासूनच्या आठवणी असतात कीं नाही? लहानपणी तो कुठे राहत होता, आपल्या आजोबांबरोबर तो कुठल्या यात्रेला गेळा होता! शाळेतील मास्तरांनी त्याला कसं मारलं होत, शाळेत त्याचे कोण दोस्त होते, पहिल्यांदी रेल्वे कशी पाहिली. आश्रम शाळेत कोण कोण होते? मजुरीसाठी, जगण्यासाठी तो कुठे कुठे गेला होता प्रत्येक माणसाच्या डोक्यात ह्या आठवणी असतात. ह्या आठंवणी आपण आपल्या पोराबाळांना सांगतो ह्या आठवणी जपून ठेवतो . त्याच प्रमाणे आपल्या जमातीला; आपल्या लोकांना आपला इतिहास माहिती पाहिजे.

आपण भिल आहोत म्हणजे कोण आहोत ते माहित होण्यासाठी आपल्याला आपला इतिहास माहित पाहिजे. आपला इतिहास आपण शोधला पाहिजे, जला पाहिजे. संस्कृत साहित्यात आपल्या भील जमातीचा उल्लेख फार पुरातन काळी केलेला आढळतो. रामायण, महाभारताचा काळ साधारणतः चार-पाच

हजार वर्षापूर्वीचा. आर्य भारतांत आले त्यावेळी येथे पूर्वीच वस्ती करून राहणाऱ्या जमाती त्यांना दिसल्या ह्या लोकांचा त्यांनी ' दस्यू' म्हणून उल्लेख केला आहे, हया दस्यूंचे वर्णन आदिवासी लोकांशी मिळते-जुळतें आहे. आदिवासी टोळयांना गण म्हणत आणि हया गणांचे जे पुढारी होते; प्रमुख होते त्यांना गणपतीं किवा गणनायक म्हणत, आजही आपण कोणाला मान द्यायचा तर नाईक म्हणतो. या आदिवासी गणांची राज्ये हिमालयाच्या पायथ्याशी होती, इतर भागातही होती. ही गणराज्ये आपली गुलाम व्हावीत म्हणून त्यावेळच्या सम्राटांनी खुप प्रयत्न केले, या गणराज्यांवर स्वाऱ्या करून ह्या गणांच्या नायकांना ठार मारले, पण केवळ गणनायकांना ठार करून हे गण गुलाम (मांडलिक) व्हायचे नाहीत. एक गणनायक मेला तर दुसरा कुणीतरी शूर माणूस गणनायक व्हायचा. ह्या गणांना, आदिवासी टोळयांना लढाई करून गुलाम करणे फार कठीण होते. याबाबत सम्राट चंद्रगुप्ताचा मंत्री कौटिल्य ह्याने लिहून ठेवले होते, गणनायकांची आपसात भांडणे लावून, त्यांना दारुचे व्यसन लावून, सुंदर स्त्रियांना पाठवून ह्या गणांची शक्ती कमी करावी, त्याशिवाय त्यांच्यावर विजय मिळवता येणार नाहीं असें त्याने मांडले होते. पण हा काळ फार पुढचा. ”

ह्यापूर्वी देखील, हजारो वर्षापूर्वी ह्या भागात माणसं राहत होतीं असे पुरावे सापडले आहेत. नाशिकला गोदावरी नदीच्या

किनाऱ्याला प्रकाशाच्या तापीच्या किनाऱ्याला जमिनीत खोल खणल्यावर हजारो वर्षांपूर्वी तेथे राहणाऱ्या माणसांच्या गाडग्या मडक्याचे, त्यांच्या हत्यारांचे अवशेष सापडले आहेत. त्यावेळचे लोकही गोफणीसारखे साधनं वापरत होते, हया गोफणीतून फेकून मारण्यासाठी वेगवेगळे लहान मोठया आकाराचे अनेक दगड त्यांनी जमा करून ठेवले होते असे आढळते. रामायणात गंगेच्या खोऱ्यातून उत्तर भारतातून इकडे दंडकारण्यात आलेल्या रामाला शबरी नावाची भिल्लीण भेटली होती अशी गोष्ट आहे. महाभारतात द्रोणाचार्यांनी तीर मारण्यात पटाइत असलेल्या एकलव्य ह्या भिल तरुणाचा अंगठा दक्षिणा म्हणून मागितल्यांची कहाणी आहे. दोन हजार वर्षापूर्वी ग्रीक देशातील एक प्रवासी भारतात येवून गेला होता. त्याने लिहिलेल्या प्रवास वर्णनात विंध्य, आरवली, सातपुडा डोंगरांच्या नमंदा, तापी नंद्यांच्या जवळ भिलटे व गोंडाळी लोक राहात असल्याचे म्हटले आहे. थोडक्यात आपले पुर्वज, आपले बापजादे हजारो वर्षापूर्वी पासुन ह्या भागात वस्ती करून राहत होतीं. थेट मेवाडपासून सहयांद्रीपर्यंत आपली वस्ती पसरली होती.

भील या शब्दाचा अर्थ काय? हे नाव कसे पडले, हे मात्र निश्चितपणे सांगणे कठीण आहे. पण असा अंदाज आहे की, भील हा शब्द बिल्लू ह्या द्रविडी शब्दातून आला असावा. बिल्लू ह्या

शद्वाचा अर्थ धनुष्य असा आहे, आणि अगदी आता पर्यन्त ज्याच्याजवळ धनुष्यबाण नाही असा भील सापडायचा नाही, जेव्हा वायव्यें कडून पंजाबमध्ये अरब मुस्लीम लोक आले, तेव्हा तेथे राहणारे रजपूत दक्षिणेकडे सरकले आणि त्यांनी मेवाड, राजस्थान, गुजराथमध्ये राहणाऱ्या आदिवासींनाखाली दक्षिणेकडे लोटले, तेव्हापासून भील जमाती सपाट, सुपीक प्रदेशातून हटून पर्वत, जंगलांच्या प्रदेशात जास्त संख्येने आले आजही सातमाळा, सातपुडा, सह्यांद्री, विंध्य हया पर्वतांच्या टेकडयांनी व्यापलेल्या भूप्रदेशात भील बहुसंख्येने आहेत, असे दिसते विशेषतः

खान्देशात आज देखील आपली वस्ती बहुसंख्य आहे. खरं तर आपल्या जमातीचा इतिहास बघतांना मेवाडपासून ठाण्यापर्यन्त पसरलेल्या सर्व पोटजमातींचा इतिहास आपण बघायला हवा. परन्तु आपण याठिकाणी मुख्यत्वे खान्देशातील भिलांचा इतिहास बघणार आहोत. आपल्या बापजाद्यांना कुठल्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले ते पाहणार आहोत. त्यांच्या शौर्याच्या हिमतींच्या कहाण्या ऐकणार आहोत.

## सातपुड्याच्या कुशीतील भील

खानदेश हा डोंगरदऱ्यांनी, दाट जंगलांनी नद्या नाल्यांनी व्यापलेला भू-भाग. येथे भरपुर पाऊस पडत नसला, येथील जमीन विदर्भातील जमीनीसारखी काळी नसली तरीही खानदेशची ही भूमी सुपीक म्हणून ओळखली जात असे, चारशे वर्षांपुर्वीही शहादे, तळोदे हे तालुके संपन्न म्हणून प्रसिध्द होते. शहादे तेव्हां एक लहानसे खेडे होते. तालूक्याचे किवा सुब्याचे मुख्य ठाणे होते. सुलतानपुर येथें दिल्लीच्या बादशहाचा सुभेदार राहात असे आणि येथील होतकऱ्यांकडून, येथून बाहेर माल पाठविणाऱ्या व्यापाऱ्यांकडून कर वसूल करीत असे. हल्लीच्या तळोदा, अक्कलकवा, धडगाव, निझर ह्या भागात त्यावेळी छोटी छोटीं राज्ये होती. ह्या राज्यांचे राजे आदिवासी होते किंवा रजपूत होते. आपल्याला काठी, पाटी, धरमपूर इत्यादी राज्यांची नांवे माहित आहेत. येथील बहुतेक शेती आदिवासींच्या हातात होती. नर्मदेच्या सातपुड्याच्या दक्षिणेला व तापीच्या उत्तरेला असलेल्या ह्या पट्टींत आदिवासी शेती करायचे व जंगलातील कंदमुळें, फळं गोळा करायचे. एकूण ह्या भागात – सुबत्ता होती, ह्यात काहीच संशय नव्हता. खानदेशातील सर्व सुब्यांमध्ये सुलतानपुर सूब्यात सर्वात

जास्त कर वसूल होई म्हणून तर सुलतानपूरला दिल्लीच्या बादशहाचा अत्यंत विश्वासु माणूस येथे सुभेदार असे. बादशहा होण्यापूर्वी औरंगजेब काही वर्षे सुळतानपुरला सुबेदार होता. औरंगजेब दिल्लीचा बादशहा झाला, त्याने दक्षिण भारतावर आपले साम्राज्य पसरावयाचे ठरवले, प्रचंड सैन्य घेऊन तो महाराष्ट्रात आला आणि खानदेशचे दिवस पलटले.

उत्तरेकडून दक्षिणेकडे येणाऱ्यांना सर्वात मोठा अडथळा म्हणजे नर्मदा नदी. नर्मदा नदी गंगे, यमुनेसारखी मोठी नाही, तिचे पात्र त्यांच्यासारखे विशाल नाही. पण विंध्य व सातपुडा ह्यांच्या डोंगर टेंकडयांतून खळाखळा वहात जाणाऱ्या नमंदेचा वेग असा आहे की, या नदीला पार करणे फारच कठीण होते. वेगाने जाणारा प्रवाह, प्रवाहातील खडक, नदीच्या दोन्ही तिरावर असलेली जंगले आणि ह्या जंगलात राहणारे आदिवांसी; हया सर्वांमुळे उत्तरेकडून येणाऱ्यांना महाराष्ट्रात, दक्षिणेकडे येणे फारच अवघड जायचे. खानदेश म्हणजे दक्षिण भारताचे प्रवेशद्वार होते असे म्हणा ना. त्यामुळे उत्तर भारतातील राजांनी बादशहांनी आपले राज्य दक्षिणेकडे पसरावयाचा जेव्हां जेव्हां प्रयत्न केला तेव्हां त्यांना विरोध केला गेला तो ह्याच भागात. नर्मदेच्या उत्तरेकडील राजेमहाराजे व दक्षिणेकडील राजे ह्यांच्या लढायांचे युध्दस्थळ होते खानदेश. हीच त्यांची युध्दभूमी होती आणि चारशे वर्षांपूर्वी

ओरंगजेबाने महाराष्ट्रातील मराठयांचे स्वराज्य नष्ट करण्याच्या इरादयाने लढाई सुरु केली तेव्हापासून खानदेशाच्या ह्या भूमीत सतत अनेक वर्षे लढाया होत राहील्या.

मराठा राज्याचा विस्तार नर्मदे पलिकडे थेट पंजाबपर्यंत झाला, पण दिल्लीपर्यंत पसरलेल्या ह्या राज्याची जेव्हा घसरगुंडी सुरु झाली तेव्हा मराठा सरदारात ज्या लढाया झाल्या त्याही खानदेशातच झाल्या. बाहेरून आलेल्या गोऱ्या ब्रिटीशांनी मराठा सरदारांच्या आपसातील लढायांचा फायदा घेऊन आपली ताकद वाढवली. सुमारे दोनशे वर्षांपुर्वी तर ह्या लढायांनी खानदेशला पार उध्वस्त करून टाकले, इंदोरचे होळकर, ग्वाल्हेरचे शिदे, व पुण्याचे पेशवे ह्यांच्या सततच्या लढांयांनी ह्या भागातील शांतता नष्ट करून लोकांना त्रस्त करून सोडले. शिदे व होळकर ह्यांच्या लढाया चालायच्या ह्या आपल्या खानदेशच्या भूमीवर. त्याकाळी सैन्य जेव्हा एखादया भागातून जायचे तेव्हा सर्व सैन्याला जगवण्यासाठी हत्ती, घोडे इत्यादी जनावरांना खायला घालण्यासाठी जे अन्न धान्य लागायचे, वैरणचारा लागायचा ते त्या भागातील शेतकऱ्यांकडून, व्यापाऱ्यांकडून जमा केले जायचे. मोठमोठया शहरातील सधनांकडून लढाया लढण्यासाठी खंडण्या वसुल केल्या जात. त्यामुळे प्रचंड नुकसान व्हायचे. अठराव्या शतकाच्या सुरवातीस तर खानदेशच्या भूमिवर सर्वत्र अंदाधुंदी माजली होती. कोणीही

उठावे चार घोडेस्वार आपल्याभोवती जमा करावे आणि लुटालुट करावी अशी स्थिती होती. मराठा सरदांराच्या ह्या लढायांनी खानदेशातील लोकांना जगणे मुश्कील झाले होते.

त्यामध्ये १८०३ साली महाभयंकर दुष्काळ पडला, माणसांना खायला अन्न नाही, जनावरांना चारा नाही, प्यायला पाणी नाही अशी परिस्थिती झाली, अश्या परिस्थितीत मदत मागायला जायचें कुणाकडे? आपला राजा कोण हेच लोकांना कळत नव्हते, आणि राजांकडे जाऊन काही उपयोगही नव्हता, सरदार राजे हे आपसातील लढयात गुंतले होते. लोक हवालदील झाले. त्यातून निमाड भागातून पेंढाऱ्यांच्या टोळया खानदेशात शिरल्या. वाटेत जी गांवे येतील, जे वाटसरु सांपडतील त्यांची लुट करीत, मुडदे पाडत, खून करत हे पेंढांरी सुरतपर्यन्त पश्चिमेकडे सरकत गेले आणि पुढील साली परत आले. सगळीकडे जिसकी लाठी ऊसीकी भैस अशी स्थिती झाली.

जे बिगर आदिवासी लोक होते त्यांनी ह्या परीस्थितीला कंटाळून स्थलान्तर करायला सुरवात केली. खानदेशाबाहेर विदर्भात मराठवाडयात त्यांचे जातीसंबध होते, ओळखीपाळखी होत्या. आपल्या जमिनी, आपली घरे सोडून हजारो माणसे खानदेश सोडून गेले. बिगर आदिवासींचे खानदेश बाहेर संबंध होते, पण

आदिवासी कुठे जाणार? हा देश ही भूमीच तर त्यांची मायभूमी होती. ह्या परिस्थीतीविरुध्द त्यांनी विरोध दाखवायचा प्रयत्न केला, मराठा सरदारांविरुध्द काही ठिकाणी विरोध दर्शविला. परिणाम असा झाला की ह्या संकटात असलेल्या रयतेला मदत देण्याऐवजी पेशव्यांच्या प्रमुख कारभाऱ्याने, त्रिबंकजी डेंगळे याने "नारोबा पाटीलाच्या मदतीने १५ महिन्यांच्या काळात १५००० भिल्लांना कापून काढले. बाळाजी लक्ष्मण याने भिल्लांना भुलथापा मारुन जंगलातून बाहेर बोलावले, आणि कोपरगांव जवळ त्यांची कत्तल केली.

ह्या सततच्या लढायांनी, पेंढाऱ्यांच्या लूटमारीने, दुष्काळाने पिडलेल्या आदिवासीसमोर जगण्याचा एकच रस्ता होता. ते परत जंगलाकडे वळले. ते डोंगरदऱ्यांच्या आश्रयाला गेले. अनेक शतकांच्या आपल्या बापजादयांच्या अनुभवावरुन त्यांना माहीत होते. पाऊस पडला नाही, शेते पिकले नाहीत तरी जंगले माणसांना उपाशी मारणार नाहीत, जंगलातील कंदमुळांची, फळाफुलांची त्यांना माहीती होती. हे जंगल आपल्याला जगवेल, पेढाऱ्यांच्या टोळयांपासून, लढाया करणाऱ्या सैनिकांपासून, डोंगरदऱ्याच आपले संरक्षण करतील हे त्यांना माहीत होते. छोटया छोटया टोळया करून आपल्या टोळी नायकाच्या नेतृत्वाखाली टेकडयांच्या माथ्यावर झोपडया बांधून ते राहू लागले. कधी कधी

आपले धनुष्यबाण घेऊन ह्या डोंगर टेकडयातून बाहेर येत जवळपासच्या गांवावर हल्ला करत, मिळेल तेवढे धान्य घेऊन हाती येतील ती गुरेढोरे घेऊन ते परत आपल्या वस्तीकडे निघून जात. |

हे लक्षात घेतले पाहिजे की, त्याकाळीही काही आदिवासींनी मुस्लिम धर्म स्विकारला असेल, काही आदिवासी मारुती; गणपती ह्या हिन्दू देवतांना नवस करत असतील, तरीं आदिवासींचे स्वतःचे देव होते, देवता होत्या. त्यांचे लग्न विधी, मृत्यू विधी वेगळे होते. आदिवासी देवतांना बोकड, हेले बळी देत. त्यांच्या विधीमध्ये दारुला एक विशेष महत्व होते. आदिवासी केवळ कोंबड्या-बकर्‍यांचेच नव्हे तर, गायी-बैलांचे मांस देखील भक्षण करत असत, आदिवासी आपल्या मृतांना पुरत असत. जाळीत नसत. थोडक्यात आदिवासींची संस्कृती हिन्दुपेक्षा बरीच वेगळी होती, त्यांच्या श्रद्धा वेगळया होत्या व अंधश्रद्धाही वेगळया होत्या.

मराठेशाहींच्या शेवटच्या काळात काही मराठे सरदारांनी ब्रिटीशांपासून मराठी राज्य वाचवण्याचे प्रयत्न केले, मराठी सरदारांनी आपसातील भांडणे थांबवून एकजूट करावीं, असे प्रयत्न केले, असे प्रयत्न करणाऱ्यांमध्ये पेशव्यांचा कारभारी त्रिबकजी डेंगळे हाही होता. पण ब्रिटीश अधिकाऱ्यानी त्याच्यावर खूनाचा

आरोप केला आणि त्याला ताब्यात घेऊन ठाण्याला कैदेत ठेवले. शिदे, होळकर, भोसले, गायकवाड हे सरदार एकत्र आले नाहीत. ब्रिटीशांनी पेशव्यांचे राज्य खालसा केले. ह्याच काळात त्रिबकजी डेंगळे ठाण्याच्या कैदेतून निसटला आणि ह्या काळात ब्रिटीश सत्तेशी लढा द्यायला फक्त आदिवासीच उपयोगी येतील, अशी खुणगाठ मनाशी बांधून तो खानदेशात आला. त्याचा अंदाज खरा होता. ब्रिटीशांशी लढायला कूणीही सरदाराने त्याला मदत दिली नाही, मदत दिली भिल्लांनीं, कोळयांनी. चाळीसगावजवळ ८००० भिल्ल त्यांच्या मुलाच्या, गोदाजीच्या नेतृत्वाखाली ब्रिटीशांशी लढायला जमा झाले. १८१८ साली ब्रिटीशांनी मराठेशाही नष्ट केली. बाजीरावाला पेन्शन देवून नर्मदेपलिकडे पाठवून दिले. सर्व मराठी सरदारांना आपली सत्ता मान्य करायला लावली, खानदेशावर ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाली. पण खानदेशावर प्रत्यक्ष सत्ता स्थापन करायला, खानदेशमधील छोटे मोठे किल्ले ताब्यात घेवून आपला अधिकार सवे प्रदेशावर प्रस्थापित करण्यास त्यांना अनेक वर्षे लागली. असीरगड, थाळतेर, अमळनेर, मालेगाव इत्यादी खानदेशातील अनेक ठिकाणी तेथल्या लहान लहान सरदारांनी, किल्लेदारांनी ब्रिटीश सत्तेला हार जाण्याचे नाकारले. त्यांनी ब्रिटीश सैन्याला विरोध करण्याचा प्रयत्न केला, हया सरदारांना भिल्ल, कोळी, रामोशी ह्या आदिवासींनी साथ दिली.

खानदेशातील पेंढारी लुटारूंच्या टोळयांना खानदेशातून पळवून लावण्यात ब्रिटीश एक दोन वर्षातच यशस्वी झालें, पण भिल्लानां पराभूत करणे, भिल्लानां आपली सत्ता मान्य करायला लावणे सोपे नव्हते. १८१८ पासून पुढील ५० वर्षे खानदेशात आदिवासी ब्रिटीशांशी लढतच राहिले. १८२५ पर्यन्त म्हणजे तब्बल सात वर्षेपर्यन्त ब्रिटीशांनी आपल्या सैन्याच्या, बंदुकींच्या, तोफांच्या बळावर आदिवासींना नेस्तताबुत करण्याचां प्रयत्न केंलां; पण त्यांना ते जमले नाही.

## ब्रिटीश राज्याची सुरुवात

गोऱ्या ब्रिटीशांनां खानदेशात शांतता प्रस्थापित करणे फार महत्वाचे होते. एक तर उत्तर भारत व दक्षिण भारताच्या सीमेवर असणाऱ्या ह्या भागातून उत्तर व दक्षिण ह्यांना जोडणारा मार्ग जात होता. तसेच आंध्रप्रदेश व सुरत ह्यांनां जोडणारा पुर्व पश्चीम मार्गही ह्यांच भागातून जात होता, शिवाय चोहोबाजूनी डोंगर टेकडयानी वेढलेला सुपीक असा भाग शत्रूच्या ताब्यात असणे फारच धोक्याचे होते. आणि सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे येथे बहुसंख्य असलेला आदिवासी. उत्तरेत आदिवासींचां गोऱ्यानां अनुभव आला होता. म्हणून ह्या भागात लवकरात ल़वकर आपली सत्ता स्थापन करायची अशी त्यांची धडपड होती. ब्रिटीश आदिवासीच्या एखादया टोळीवर सुसज्ज सैन्याने हल्ला चढवत. अतिशय चिकाटीने ह्या टोळीचा दर्याडोगरात पाठलाग करून ते टोळीला गाठत, त्यांच्याशी लढा देत त्यांच्या नेत्याला, नायकाला पकडण्यात किवा ठार करण्यात यशस्वी होत. टोळीतील सर्व स्त्रीपुरुषांना पिटाळून लावीत. मग विजयी झाल्याच्या आनंदात आता ही टोळी आपल्याला परत त्रास देणार नाही अशा विचारात ते परत निघत. आणि अर्ध्या रस्त्यातच त्यांना माहिती मिळे, नवीन

टोळीनायकाच्या नेतृत्वा-खाली परत स्त्रीपुरुष जमा झाले आहेत, सतत सात वर्षे आपल्या सैन्याच्या बळावर त्यांनी आदिवासीनां हरवण्याचा प्रयत्न केला.

आदिवासी टोळीनायकांना तनखे देण्याची लाच देवून त्यांना आपल्या बाजूला घेण्याचा प्रयत्न केला पण ब्रिटीशानां ह्यात यश आले नाही, आदिवासी ब्रिटीशा सत्तेला विरोध करीतच राहीले. नंदुरबाराच्या भिल एजंटाने सातपुड्यातील टेकड्यांत वास्तव्य करणाऱ्या, आणि सपाटीवरील गावात लुटालूट करणाऱ्या अनेक टोळी नायकाशी संधान साधले. त्यांना तनखे देण्याचे आश्वासन देवून शरण येण्यास सांगितले. सातपुडयात सुभान्या, रामजी, ऊचीत इत्यादी नाईकांनी आपल्या टोळया जमवल्या होत्या, ह्या तिघांना पांचशे रुपयाचा तनखा कबूल करूनही काही उपयोग झाला नाही, सुभान्याने नंदुरबार व शहादा भागातील काही खेड्यावर हल्ले चढवले. सुभान्या १८१९ मध्ये पकडला गेला, पण तो तुरुंगातून पळाला. काही दिवसांनी सुभान्याने परत २०० रुपये तनखा घ्यावयाचे कबूल केले, तसेच त्याने रामजीचेही मन वळवून त्याला शरण आणले, पण ऊचिताने मात्र तनखा नाकारला १८२७ साली ऊचित बांडाने एका पटेलाला ठार केले आणि तो पहाडात पळाला सुभान्या त्याला जाऊन मिळाला, त्या दोघांनी परत

लटालूट सुरु केली ऊचित बांड पकडला गेला पुढे तो धुळयाच्या जेलमध्ये मरण पावला.

सुभान्याला पकडून हदपार केले गेले. पण १८२४ साली परत आल्याबर त्याने सुलतानपूर लुटले. त्याच्यावर पाठविण्यात आलेल्या सैनिकांच्या पळटणीतील २२ सैनिकांना सुभान्याच्या लोकांनी जखमी केले; व हा हल्ला परतून लावला. ब्रिटीशांनी आणखी सैनिक आणले, काही महिन्यांनी  राणा नाईकाने सुभान्याला पकडून दिले. सुभान्या धुळयाच्या जेलमध्ये मरण पावला. ह्याशिवाय सुलतानपुर, सेंधवा, शिरपूर, चोपडा, जळगाव, थाळनेर

ह्या भागातील कितीतरी बांड आपापल्या टोळया घेऊन ब्रिटीशानां त्रास देत होते. कान्या, दशरथ, देवचंद, सयाजी आभिमान अशी किती तरी जणांची नावे सांगता येतील, ब्रिटीशांनी त्यांनां देवू केलेले तनखे नाकारुन रानोमाळ ते लफ्त छपत फिरत राहिले. ब्रिटीशानां शरण आले नाहीत. कित्येक पकडले गेले, कित्येक लढता लढता मेले. जगण्यासांठी ते गांवांवर हल्ले करीत, लटालूट करीत, हे खरे असले तरी गुलामाचे जीवन न जगता स्वतंत्रपणे जगण्याचा त्यांना दुसरा मार्गच नव्हता. दशरथ बांड नर्मदा पार करून गेला, त्यावेळी निमाड प्रदेशात शेख दुल्ला

नावाचा पेंढारी गोंधळ घालत होता. दशरथ ह्या दुल्लाला जाऊन मिळाला. या दुल्लाचा ह्या भागात एवढा दरारा होता को, त्याच्याबद्दळ वर्णन करतानां निचे जमीन, ऊप्पर अल्ला l बिचमे फिरे शेख दुल्ला ' असे म्हणत असत. चिखलीचा नाईक, देवजी नाईक ह्याला ब्रिटींश भिल एजंटने सव्वासहा रुपये तनखा महिन्याला देवू केला होता. १८२५ पर्यन्त सतत प्रयत्न करूनही ब्रिटीशांना या भागात शांतता करता आली नाही. नायकाना तनख्याची लालूच देवूनही साधले नाही, सैन्याच्या साह्याने दंडूकेबाजीने कांही साधले नाही. ह्यानंतर ब्रिटीश अधिकाऱ्यांनी आपली निती बदलली. त्यांच्या लक्षात आले

आदिवासी लूटमार करतात, कारण त्यांचे जीवन उध्वस्त झाले आहे, ह्यांचे नीट पूनर्वसन केल्याशिवाय, ह्यांचे जीवन सुरक्षीत केल्याशिवाय ह्या लोकांना शांत करणे शक्य नाही.

ह्यावेळी धुळे जिल्ह्याचे तीन विभाग पाडून प्रत्येक विभागावर भील एजंटांची नियुक्ती करण्यात आली. ह्या भिल्ल एजंटानी भिल्लानां जमीनी देवून शेतीत वसवायला सुरवात केली. नायकांना तनखे देवून आपापल्या भागात शांतता राखण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली, ह्याशिवाय ब्रिटीशानी आपल्या कूटनितीचा अवलंब केला. कॅप्टन औट्रम ह्या अधिकाऱ्याला.

भील पलटण उभी करण्याचा आदेश देण्यात आला. कॅप्टन ओट्रंम शूर व धाडशी होता. त्याने भिल्लांवर, विश्वास टाकला, त्यांच्या भिलाटय़ात जाऊन निशस्त्र राह्यला त्यानं सुरुवात केली. भिल्लांबरोबर जंगलात, पहाडात हिंडून जंगली जनावरांना तोंड देवून त्याने आपल्या शौर्यांचा दाखला दिला. काही दिवसात मालेगाव येथे भिल्ल पलटणीचे शिक्षण सुरु झालें. ह्या पलटणीच्या साह्यानेच ब्रिटीशांनी डोंगर पहाडातील भिल्ल बांडांना शरण आणले. येथल्याच लोकांना पगार, नोकऱ्या, खास सवलती देवून आपल्या बाजूला घ्यायचे आणि त्यांच्या मदतीने येथील लोकांवर सत्ता गांजवायची ही तर गोऱ्या ब्रिटीशांची कूटनितीच होती. भिल्लानां जमीनी देवून शेतीवर वसवणे, तनखे देवून त्यांना जागल्यांचे रखवालीचे काम देणे, सेंधवा सारख्या घाटात प्रवाद्यांना-संरक्षण देण्याची जबाबदांरी देणे आणि वेळ पडली तर भिल्ल पलटणीच्या साह्याने त्यांना शरण आणणे हया मार्गांनी ह्या भागात काहीशी श्यांतता प्रस्थापित करण्यात ब्रिटीश यशस्वी झाले. पण याचा अर्थ आदिवासींनी ब्रिटीश सत्ता मान्य केली होती असा नव्हता. आदिवासी भिल गप्प झाले होते असाही नव्हता. १८५७ पर्यंत खानदेशात आदिवासीतील असंतोष, आदिवासींना ब्रिटीशांबद्दल असलेला राग खदखदतच राहीला आणि १८५७ साली संधी मिळताच परत एकदा आदिवासी हातात तीर कामठा

घेऊन, ठासणीच्या बंदुका घेवून अन्याय्य सत्तेविरुध्द उभे राहिले. उत्तर भारतात सत्तेविरुध्द उभा झालेला बंडाचा झेंडा नर्मदेच्या दक्षिणेला फडकत ठेवला तो केवळ आदिवासींनी, विशेषतः भिल्लांनी, हे लक्षात घेतले पाहिजे.

## **१८५७ च्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील भिल्लांचा सहभाग**

१८१८ ते १८२५ ह्या सात वर्षांत बिटीश अधिकाऱ्यांनी आपल्या सैन्याच्या साह्याने आदिवासी बंडखोरांनां वठणीवर आणण्याचे प्रयत्न केळे पण हया प्रयत्नाना यश आले नाही, हे आपण पाहिले. एक लक्षात घेतले पाहिजे, ब्रिटीशाविरुद्ध लढण्यात भिल्लच पुढे होते असे नाही. कोळी, रामोशी, अजंठ्याचे भिल्ल, नगरचे भिल्ल सर्वच ब्रिटीशांशी लढत होते. ह्यातील काही जणांचे एकमेकाशी संबंध होते. पण बहुतेक सर्व आपल्या स्वतःच्या हिंमतीवर एक एकटेच लढत होते. आणि तरीही ब्रिटीश सैन्याला ह्यांना नामशेष करून, खानदेशात शांतता स्थापित करणे शक्य झाले नाही. १८२५ नंतर, भिल्लांना जमीनी देबून एका जागी वसवणे, भिल नायकांना तनखा देवून त्यांच्यावर रस्त्याच्या संरक्षणाची जबाबदारी टाकणे, बांड टोळी नायकांना पेन्शन देवून शांत करणे आणि भिल्लांचीच पलटण उभारुन त्यांना आपल्या बांधवांशी लढायला लावणे अशा मार्गांनी ब्रिटीशांनी १८३० च्या सुमारास खानदेशात थोडी फार शांतता निर्माण केली. भिल्लांवर होणाऱ्या अन्यायाचे निराकरण करण्यासाठी भिल्ल एजंटाना अधिकार देण्यात आले. त्याचांही थोडाफार उपयोग झाला. पण तरीही भिल्ल पुर्णपणे शांत झाले नाहीत. ह्याला एक महत्वाचे

कारण होते. ह्यापूर्वी हिंदु व मुस्लीम राजांनी असे धोरण अवलंबलेले होते की डोंगर-टेकड्यांचा जंगलांचा भाग जेथे आदिवासी बहुसंख्येने वस्ती करून होते अशा भागांना ते धक्का लावत नसत. त्यांच्या लढाया चालत पण त्या सखल भागात. आदिवासींच्या जीवनात फारशी ढवळाढवळ हिंदु राजे व मुस्लीम बादशहा करत नसत. पण ब्रिटीशांनी येथील समाज व्यवस्थेची घडीच विस्कटायला सुरुवात केली होती.

खेडयातील शेतकऱ्यांनी सरकारला भरण्याचा सारा पैशातच भरला पाहिजे असा त्यांनी नियम केला. शेतकऱ्याला त्याच्या जमिनीचा मालकी हक्क देवून त्याने सरकारला सारा भरावा असे सांगण्यात आले. ह्यामुळे गावातील पुर्वीचे संबंधच बदलायला लागले, तसेच गावाच्या आसपास असणारीं जंगले तोडून ही जमीन लागवडीखाली यावी असे प्रयत्न ब्रिटीशांनी सुरु केले, मोठ्या प्रमाणात जंगल तोडही सुरु झाली. ह्यामुळे जंगलातील कंदमुळं, फळांवर जगणाऱ्या आदिवासींच्या जीवनांवर परिणाम व्हायला लागला. आदिवासींच्या जंगलावरील आधिकारांवरही मर्यादा यावयास सुरुवात झाली. ब्रिटीश सरकारने सावकारानां साथ दिली त्यामुळे सावकारांचे अत्त्याचारही वाढत चालले. ह्या सर्वाचा परिणाम म्हणून आदिवासीचे उठाव होतच राहिले. १८४५ मध्ये नगर व नासिक जिल्ह्यात रघोजी भांगरे ह्या कोळी नाईकाने बंड

पुकारले. १८४७ मध्ये अक्राणी तालुक्यातील अरोळे गांवावर भिल्लांनी हल्ला केला. चिखलीच्या कुंवर वसावाने बंड पुकारले. नंदुरबारच्या भिल एजंटावर कुंवर नाईक नाराज होता, आपल्या कारभारात भिल एजंट हस्तक्षेप करतो हे त्याला बिलकुल पसंत नव्हते. ब्रिटीशांनी त्याला शरण आल्यास माफी देण्यात येईल म्हणून सांगितले पण कुंवर वसावा माफी मागण्यास तयार नव्हतां पुण्याहून घोडेस्वांरांचे दल, मालेगावहून भिल पलटणीतले सैनिक आणून त्याच्यावर हल्ला करण्यात आला, कुंवर वसावा पकडला गेला पण त्याने ब्रिटीशांशी जोरदार टक्कर दिली, कुंवर वसावाला दहा वर्षांची सक्त मजुरीची सजा देण्यात आली. कुंवर वसावाचा मुलगा रामसिंग व पुतण्या सोनाजी ह्यानां ब्रिटीशांनी पुण्याला शिक्षणाला पाठविले. पुण्याच्या त्यावेळच्या कॉलेंजात त्यांनी प्रथम तर चांगलीच प्रगती दाखवली, पण त्यानंतर ते दोघे कॉलेजच्या प्रमूख प्राध्यापक मेजर केन्डीशीच भांडले व कॉँलेज सोडून पळून ह्या भागात परत आले. आपल्या बंडखोर बापासारखा पोरगाही होवू नये म्हणून ब्रिटीशांनी रामसिंगला पुण्यासारख्या शहरात पाठवले होते. पण रामसिंगने आपल्या बापाचा कारभार हाती घेतला आणि तोहीं गप्प राहिला नाही. पुढे ब्रिटीशांनी १८७८ मध्ये रामसिंगलाही पकडले आणि जन्मठेपेची सजा देवून देशाबाहेर पाठवले.

१८४५ नंतर पुढील दहा वर्षे भिल्ल शांत होते. जणु एकेकट्याने लढून काही फायदा नाही ह्याची त्यानां जाणीव झाली असावी, आणि योग्य संधीची, योग्य परिस्थीतीची तें वाट पहात असावेत. तशी परिस्थिती लवकरच प्राप्त झाली. ब्रिटीशांनी येथील राजांची संस्थाने खालसा करावयास सुरवात केली, त्याचे निमित्त झाले आणि ब्रिठोशांबहल ह्या देशातील लोकांच्या मनात राजेरजवाडे, संस्थानिक ह्यांच्या मनात: जो राग होता तो ऊफाळून आला, १८५७ च्या स्वातंतर्यलढयाला सुरूवात झाली, ब्रिटीशांच्या सेन्यात नोकरी करणाऱ्या हिन्दी शिपायांनी बंड पुकारले आणि ही आग झपाटयाने पसरत गेली, ह्या संधीचा फांयदा घेऊन खानदेशात, नगर, नाशिक, निमाड, निजामशाही सगळीकडचे भिल नायक बंडाचा झेंडा ऊंचावून ब्विंटींशांविरुध्द उभे राहीले. सुरुवात केली काजरसिंग नाईकाने, खाज्या नाईकाने.

## वीर खाज्या नाईक

खाज्या नाईक हा १८२१ ते १८४१ पर्यन्त वीस-वर्षं ब्रिटीशांच्या नोकरींत होता. ऊत्तर दक्षिण जोडणाऱ्या, हल्लीच्या मुंबई आग्रारोडवरील सेंधवा घाटाच्या भागातून प्रवास करणाऱ्या व्यापाऱ्यांना, प्रवाशांना संरक्षण देण्याचे काम तो करत होता. त्यावेळी ह्या मार्गाने मुंबईकडें माल नेला जाई. विदर्भातील कापूस, गांजा, अफू ही शेतीमाल भिवंडी पर्यन्त बैलगाडीनं पोचवले जात, तेथुन. हा माल पुढे युरोपात, चीनला पाठविण्यात येत असे. घनदाट जंगलातून जाणाऱ्या ह्या शेकडो बैलगाडयांना संरक्षण देणाऱ्या पोलीस पथकाचा खाज्या नाईक प्रमुख होता. एक पकडलेला लूटारु चौकशी करताना खाज्या नाईकाच्या हातून मारला गेला आणि खाज्याला दहा वर्षांची सजा झाली. पण १८५५ मध्ये त्याची सुटका झाली. खाज्याने आपल्याला परत नोकरीत घ्यांवे अशी विनंती केली परन्तु अधिकाऱ्यानी विनंतीकडे दुर्लक्ष केले. १८५७ साली वातावरण तापू लागले, तशी ब्रिटीशानां खाज्या नाईकांची आठवण झाली, त्याला परत नोकरीस घेण्यात ब्रिटीश तयार झाले, पण आता खाज्याच तयार नव्हता. मधल्या काळांत तो काय झोपून राहिला नव्हता. देशात काय होत आहे, ह्याच्या बातम्या त्याला

मिळत होत्या. ऊत्तर भारतांत जे काय घडत होते त्यामूळे ब्रिटीश घाबरले आहेत हे त्याच्या लक्षात आले होते. दोन वर्षे वाट पाह्यला लावल्यावर आताच ब्रिटीश आपल्याला नोकरी द्यावयास का तयार झाले हे ही त्याला समजत होते, त्यामुळे दिल्लीहून -ईशारा मिळताच खाज्या नाईक, भीमा नाईक, मेवांशा नाईक ह्यांनी बंडाचा झेंडा उभारला. भीमा नाईक, मेवाशा नाईक व आनंदानं आपल्या भोवती ७ -८ शे भिल्ल जमवले. आणि त्यांनी गांवे लुटायला सुरवात करून ब्रिटीश सैन्याला लढयाचे आव्हानच दिले. हणमंतराव हा भिल नाईक ही त्यांना येवून मिळाला, त्यांनी दांतेवारां गांवावर हल्ला करून हे गाव ऊध्वस्त केले. काजरसिंग ऊफ खाज्या नाईकाने बंडाचे निशाण ऊभारल्याबरोबर खानदेशातील सगळया भागातून भिल येवून त्याच्या सैन्यात दाखल होऊ लागले, त्याने जवळच्या खेडयात लुटालूट केली आणि सेंधवा घाट कब्जात घेऊन येणाऱ्या जाणाऱ्या बैलगाड्यांवर, कर वसुली करण्यास सूरूवात केली.

ह्याच सुमारास होळकरांच्या राज्यातून मुंबईला जाणारा सरकारी खजीना खाज्या नाईक आणि त्यांच्या साथीदारांनी लुटला. खजिन्याचे रक्षण करण्यासाठी तीनशे सैनिक होते. पण पण त्यांनी भिलांना विरोध न करता खजीना लुटण्यास मुभाच दिली, ह्या लुटीत बंडखोरांना ७ लाख रुपयाचा ऐवज मिळाला. ह्या लुटीने

ब्रिटीशांचे धाबेच दणांणले. तसं पाहिले तर होळकर राजे काही ब्रिटीशाविरुध्द नव्हते. पण त्यावेळचे वातावरणच असे होते की होळकरांच्या सैनिकांची भिलानां सहानुभतीच होती. खानदेश पेटला तर आपली सत्ता टिकवणे अतिशय अवघड होईल हे ब्रिटीशांना चांगले कळत होते. त्यांनी भराभर वेगवेगळया भागातून घोडदळ, पायदळ सैन्य खानदेशमध्ये पाठवायला सुरुवात केली. खजीना लुटण्यात आलेल्या यशाने खाज्या नाईकाची ताकदही वाढली. ४००-५०० लोक बरोबर घेऊन त्याने पळासनेर लुटले, महादेव नाईक व दौलू नांईक हे आपल्या लोकांसह त्याला येऊन मिळाले. खाज्या नाईक भोरघाट किल्ल्याकडे वळला.

चोहोकडून दुरुन दुरुन भिलांच्या टोळया येऊन त्याच्या सैन्यात दाखल होत होत्या, अक्राणी महाल भागात ब्रिटीश सत्तेविरुध्द उभा रहोलेला काळूबाबा खाज्या नाईकाला येऊन मिळाला होता. होळकरांच्या धार संस्थानच्या सैन्यातील रोहीले, मक्राणी, अरब सैनिकही खाज्या नाईकांच्या सैन्यात दाखल होत होते. चोहोकडे भिल ब्रिटीशांविरुद्ध उठले होते. सुलतानपूर मधील अश्याच भिल बंडखोरांनी सारंगखेडा गांवावर हल्ला चढवला, मंदाण्याचा रुमाल्या नाईकही स्वस्थ नव्हता. शहादा भागातील भिलांच्या वाढत्या हालचाली पाहून सैन्याची एक पलटण तेथे पाठविण्यात आली. ह्याच काळात भीमा नाईकही खाज्या नाईकाच्या साथीला

आला. खाज्या नाईक व भीमा नाईक ह्यांनी आपल्या १५०० साथीदारासह ६० अफूच्या गाड्या लुटल्या पोस्ट ऑफिसही लुटले.

भीमा नाईक हे ह्या लढ्यांतील अत्यन्त गुढ असे व्यक्तीमत्व आहे. ब्रिटीशाविरूद्ध १८६८ पर्यन्त सतत दहा वर्षे एकाकी लढत राहिलेल्या ह्या कुशल संघटकाचे खानदेश, नाशिक, नगर, निमाड भागातील भिलांशी संबंध होते. नासिक, नगर भागात ब्रिटीशानां तंग करून सोडणाऱ्या भागोजी नाईकानेही खाज्या नाईकाला येऊन मिळण्याचा प्रयत्न केला. तो निजामाच्या राज्यातून खानदेशकडे निघाला पण ब्रिटीश सैन्याने त्याला वाटेतच अडवून परतायला लावले. भीमा नाईकाने असे घोषित केले होते की, दिल्लीच्या बादशहाने खानदेश मुक्त करण्याचा त्याला आदेश दिला आंहे. आपला लढां हा ह्या देशाला गोऱ्यांपासून स्वतंत्र करण्यासाठी आहे आणि म्हणून ब्रिटीशांच्या पदरी असणाऱ्या ह्या देशांच्या पोलीसांनी, सैनिकांनी बंडखोर भिल्लांना सामील व्हावे असे आवाहन त्याने केले होते. मात्र ह्या शूर सेनानीची, भीमा नाईकाची इतिहासाला काहीच माहिती नाही. तो कुठल्या भागातील होता, कोणत्या गांवचा होता ह्याची, काहीही माहिती ऊपलब्ध नाही. भीभा नाईक, मेवाश्या नाईक, खाज्या नाईक, काळू बाबा; दौलू नाईक अश्या अनेक टोळी नायंकांच्या नेतृत्वाखाली ब्रिटीश सत्तेचे

जोखड तोडून फेकायला शेकडो आदिवासी स्त्री पुरुष तयार झाले होते. ह्या भिल लढवय्यानां बडवानी, होळकर संस्थानांची सहानुभूती होतीच पण जनतेचीही सहानुभती होती.

ब्रिटीशानी भिलांचा उठाव दडपून टाकण्यासाठी सर्व प्रकारचे उपाय अमंलात आणले. जिल्ह्यातील सैनिकांची ठाणी वाढविण्यात आली. अनेक ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या ह्या भागात नेमणूकी करण्यात आल्या. त्यांना कडक कारवाई करण्यांचे अधिकार देण्यात आले. धरणगांव व मालेगांव येथे भिलांच्या पलटणी उभारण्यात आल्या. एवढेच नाही तर भिलांशी लढण्यासाठी कोळी आदिवासींच्या पलटणी नगर जिल्ह्यात उभ्या केल्या गेल्या. जागोजागी भिलांना वेढून त्यांची ताकद खत्म करण्याचे प्रयत्न सुरु झाले.

काजोशिंग आणि त्याच्या साथीदारांना अखेर बडवानी जवळ गांठण्यात ब्रिटीश सैन्य यशस्वी झाले, मेजर इव्हान्स जेव्हा बडवानी जवळ पोहचला तेव्हा बडवानीचा कोतवाल त्याला सामोरा गेला, मेजर इव्हान्सने, खाज्या नाईक, भीमा नाईक ह्यांच्याबाबत वारंवार विचारुनही कोतवालाने त्यालां काही पत्ता लागू दिला नाही. तरी पण ब्रिटीशांना खबर लागली की, जवळच्याच जंगलात, अंबापाणीच्या डोंगराच्या आश्रयाने ३००० भील; मकराणी,

रोहिले बंडखोर लपले आहेत. ब्रिटीश सैन्याने ताबडतोब हांलचाल केली. आपल्या सुसज्ज शस्त्रास्त्रासह त्यांनी भिल बंडखोरांना चोहोबांजूनी वेढले, भिल बंडखोर डोंगरावर चढले, ब्रिटीश सैन्याने त्यांना कोंडीत पकडले होते, पण झाडाझूडपांच्या, दगडाधोंड्याच्या आधाराने भिलांनी ब्रिटीश सैन्याशी लढायला सुरुवात केली. भिल बंडखोरांची संख्या बरीच होती, पण त्यांच्याकडे पुरेशा बंदुका नव्हत्या. पुरेसा दारुगोळा नव्हता. पण तरीही बंडखोरांनी मोठय़ा शौर्याने हिमतीने ब्रिटीश सैन्याशी सामना दिला. बंडखोरांबरोबर आदिवासी भिल स्त्रियाही होत्या, त्याही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढत होत्या. घमासान लढाई झाली, मकराणी, रोहीले मोठ्या जिहीने लढले.

ब्रिटीशांचे दोन अधिकारी मारले गेले, १६ सैनिक मारले गेले, कित्येक सैनिक जखमी झाले. पण बंडखोरांची फारच हानी झाली. अनेक स्त्री पुरुष ब्रिटीशांच्या बंदुकांच्या गोळयांना बळी पडले. दगडाधोंड्यांमध्ये, नाल्यांच्या घळयांमध्ये, गवतावर, सर्व डोंगरावर बंडखोरांची प्रेते पडलेली होती. ब्रिटीशांनी ४६० बंडखोर स्त्री-पुरुषांना कैद केले. ह्यात खाज्या नाईक, मेवाशा नाईक, भाऊ रावळ ह्यांच्या बायका होत्या, भीमा नायकाची पुतणी होती. खाज्या नाईकांचा मुलगा पोलादसिंग मारला गेला होता. बंडखोरांचे प्रचंड नुकसान झाले होते, पण खाज्या नाईक, भीमा नाईक व त्यांचे काही

साथीदार जीवंत निसटले होते. मकराण्यानी भिल नायकांचे रक्षण करण्यासाठी ब्रिटीश सैन्याशी मोठ्या जिद्दीने सामना दिला, पकडलेल्या कैद्यांतील ५५ कैद्यांना ब्रिटीश सैनिकांनी तेथल्या तेथे गोळ्या घालून ठार केले. आदिवासी स्त्रीयांना अटक करून तुरूंगात डांबले. इतर वेळी आपल्या न्यायनिष्ठतेचा डंका पिटणाऱ्या ब्रिटीशांनी भिल्लांचे बंड मोडून काढण्यासाठी सर्व मार्ग अवलंबले. आदिवासी स्त्रियांना कैदी करण्यामागे त्यांचा उद्देश स्पष्ट होता, त्यांना माहित होते, आदिवासी आपल्या स्त्रियांनां फार मान देतात, फार इज्जत करतात. आपल्या आयाबहिणींना, आपल्या बायकांना त्रास होवू नये म्हणून भिल्ल पुरुष काहीही करायला तयार होतात, हे त्यांना माहित होते. आदिवासी स्त्रियांना तुरुंगात डांबले तर आदिवासी बडखोर शरण येतील अशी ब्रिटीशांची अटकळ होती. पण केवळ तेवढेच कारण नव्हते. आदिवासी स्त्रिया आदिवासीं पुरूषांइतक्याच ह्या लढ्यात पुढे होत्या हेही त्याचे एक कारण होते. आपल्या पुरुष मंडळी बरोबर डोंगर-दऱ्या, पहाडात तर ह्या जायच्याच पण लढाईच्या मैदानातही त्या मागे रहात नसत. ह्याशिवाय शत्रूकडच्या बातम्या मिळविण्याचे, निरोप पोचवण्याचे कामही त्या हुशारीने व धाडसाने करत असत. आदिवासींमध्ये स्त्रियांनी घरामध्ये राह्यचे आणि पुरुषांनी बाहेरच्या जगात वावरायचे अशी वाटणी नव्हती.

आपल्या असंख्य साथीदारांचा मृत्यू, आपल्या कुटुंबाची झालेली वाताहात अनुभवनही खाज्या नाईकाची हिंमत खचली नव्हती. ब्रिटीशांशी सामना देण्याची त्यांची तयारी होती आणि तसा तो लढतही राहिला. पण मधल्या काळात देशाची परिस्थिती बदलली होती. उत्तर भारतातील बंडाचा बिमोड करण्यात ब्रिटीश यशस्वी झाले होते. तात्या टोपे नर्मदेपर्यन्त येवून परत गेला होता. झाशीची राणी बलीदान झाली होती. पण भिल्लांचा विरोध मोडून काढण्यात ब्रिटीश यशस्वी झाले नव्हते. खाज्या नाईक मोकळा होता, भीमा नाईक लढत होता. भागोजी नाईक ब्रिटीशांशी टकरत होता.

ब्रिटीशांनी आपल्या कूटनितीचा डाव टाकला, थकलेल्या दुबळया झालेल्या एकाकी पडलेल्या खाज्या नाईकाला निरोप पाठविला. खाज्या नाईकाने आपल्या सर्व साथीदारांना त्यांच्या त्यांच्या गावांकडे परत पाठवावे व धुळयाच्या कलेक्टरला शरण यावे, दयाळू मायबाप सरकार खाज्या नाईकाला ठार मारणार नाही, फाशी देणार नाही, जीवंत ठेवून जन्मठेपेच्या शिक्षेवर पाठवेल. देशातील वातावरण बदलले होते, ठिकठिकाणी बंडखोरांचा पराजय झाला होता. स्वातंत्र्य लढयातील धुरंधर सेनानी एक तर मरण पावले किंवा भूमीगत झाले होते. जवळपासचे संस्थानिक आता घाबरुन गप्प झाले होते. गावांतील लोक आता भील

बंडखोरांना साथ देण्यास तयार नव्हते. सातपुडय़ाच्या सह्याद्रीच्या जंगलात खाज्या नाईकाला, कित्येक वर्षे ब्रिटीश सैन्याला न सापडता जीवंत राहता आले असते, लढतही राहता आले असते. पण असे एकाकी लढत राहण्याने ब्रिटीश सत्ता जाणार नव्हती हे त्याला माहीत होते.

आपल्यावर विश्वास ठेंवून लढयात उतरलेल्या असंख्य आदिवासी बंधूभगीनींचे जीवन उध्वस्त होणार हे त्याला दिसत होते. तरी पण सशर्त शरण जाण्यास त्याने नकार दिला, त्यानं सांगितले, जर ब्रिटीश सरकार त्याला विनाशर्त संपूर्ण माफी द्यायला तयार असेल तरच तो लढा थांबवायला तयार आहे. खाज्या नाईक खरोखरच शरण आला का? शरण आल्यावर त्याचे काय केले? ह्याबद्दल निश्चित माहिती नाही. असे सांगण्यात येते की, नर्मदा पार करून तो निमाड भागात गेला आणि तेथे लढाईत मारला गेला. दुसरी आख्यायिका अशी आहे की, ब्रिटीशांनी त्याला जीवंत तर सोडले, पण त्यानंतर त्याच्या शरीर रक्षकाला फितवून त्याच्याकरवी खाज्या नाईकाचा खून करण्यात आला.

## भागोजी नाईक

खाज्या नाईकाला हरवले तरी भिल्लांचे बंड शमले नाही. भीमा नाईक तर मोकळा होताच, पण नगर-नासिक भागात भागोजी नाईकही लढत होता. भागोजी नाईक हा अहमदनगर येथील पोलीस दलात चांगल्या हुद्द्यावर होता, इंग्रजी सत्तेला विरोध करणे म्हणजे काय? ह्याची त्याला चांगलीच कल्पना होती. भागोजीने पुणे-नासिक हमरस्त्यावरील संगमनेर जवळील टेकड्यांचा आश्रय घेऊन लढ्यास सुरुवात केली आणि त्याच्या कार्यक्षेत्राचा लौकरच विस्तार होऊन चांदवड, दिडोरी, सुरगाणा, मनमाड, येवला आणि सिन्नर भागात साम्राज्यशाही सरकारला एक जबरदस्त आव्हान त्याने निर्माण केले, १८५७ च्या ऑक्टोबर महिन्यात लेफ्टनट हेन्री या ब्रिटीशांच्या प्रमुख सेनांधिकाऱ्यांशी भागोजीची सलामी झडली. १८५८-५९ या काळात इंग्रजांचे सैन्य सतत भागोजीच्या मार्गावर होते. भागोजींचा भाऊ महिपत नाईक आणि कॅप्टन नटल यांची समोरा समोर गाठ पडली. घनघोर लढाई झाली. त्यात भिल्लांनी आपल्या अद्वितीय शौर्याचा परिचय इंग्रजांना करून दिला, महिपत या युद्धात कामी आला. अनेक माणसे कामी आली.

पण भागोजी आणि त्याचा भाऊ हिंरोजी यांची ताकद कमी झाली नाही. दुरदुरचे भिल्ल, ठाकूर, कोळी त्याला येवून मिळू लागले.

दोन वर्षांच्या काळात अहमदनगर, अजंठा, नातिरहिरा अश्या अनेक ठिकाणी ब्रिटीश सैन्याने भागोजीला गाठून त्याच्यावर हल्ले केले, पण जंगजंग पछाडूनही ब्रिटीश भागोजीला नमवू शकले नाहीत, ५९ च्या उन्हाळयात देखील भागोजी ब हिरोजी लढतच होते. अखेर जुलैमध्ये संगमनेर जवळ अंमोरा दारा येथे कॅप्टन नटल भागोजीला गाठण्यात यशस्वी झाला. भागोजी व हिरोजी खरं तर मोक्याच्या जागी होते. पण आपल्या कोळी सैनिकांच्या साह्यांने नटल त्यांना त्यांची जांगा सोडायला लावण्यांत यशस्वी झाला. या लढाईत भागोजीचा मुलगा यशंवत मारला गेला. दहा लोक मारले गेले, अनेक जखमी झाले काही पकडले गेले. पकडले गेलेल्यात हिरोजी नाईकही होता.

पण एवढी हाती होऊनही भिलांचा विरोध कमी झाला नाही. उलट निजामाच्या राज्यातून भागोजीला मदत करायला अनेक भिल येत आहेत, अशी बातमी ब्रिटीशांना समजली, ब्रिटीशानी निजामांच्या सरहहीवर पुन्हा घोडेस्वार पलटणीची सतत गस्त सुरु केलीं. ऑक्टोबरमध्ये भागोजीने कोपरगाव जवळील एका गावावर छापा मारला. कॅप्टन नटलने त्याचा पाठलाग केला तेव्हा भागोजी

सह्याद्रीच्या काठाने कोकणाकडे वळला पण अर्ध्या रस्त्यानेंच तो परत नगरकडे निघाला. ब्रिटीश त्याच्या मागावर होतेच. १५० घोडेस्वार सैनिक असलेल्या पंलटणीने भागोजीला संगमनेर जवळील मिठासागर जवळ गाठले येथे पंचाळा गावाच्या पाटलाने खबर आणली की, भागोजी आणि त्यांचे साथीदार तेथून पांच मैल अंतरावरील एका नाल्याजवळ विश्रांती घेत आहेत. ब्रिटीश अधिकाऱ्यांनी भागोजीला उत्तरेकडून गाठायचे ठरवले. ह्याठिकाणी तीरावर दाट जंगल होते, टेकड्या होत्या, नदीत पाणी खोल होते. भिलांना ढकलत-ढकलत मोकळया मैदानात काढायचे असे ब्रिटीशांनी ठरवले, भागोजीला चाहूल लागू न देता घोडेस्वार व पायदळ सेन्य घेऊन भागोजीला गाठण्यात ब्रिटीशांना यश आले. बंडखोर नजरेस पडताच घोडेस्वारांनी एकाएकी त्यांच्यावर हल्ला चढवला. ह्या अकस्मात झालेल्या हल्ल्याने भिल बंडखोर बेसावध सापडले, कित्येक बंडखोर तर आपल्या ठासणीच्या बंदुका सावरण्याच्या आतच सैन्याच्या गोळयांना बळी पडले. पण काही क्षणातच ते सावरले. पाठीमागे नदीचा उभा तट, भोवती दाट जंगल ह्यांचा आधार घेत त्यांनी स्वत:चा बचाव करीत ब्रिटीशांच्या गोळयांना प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली. त्यांना तेथून मोकळया जागेवर आणण्यात अपयश आलेले पाहून ब्रिटीश अधिकाऱ्याने काही निवडक निशाणबाजांना बरोबर घेऊन गोळया झाडत

भिलांच्याजवळ जाण्यास सुरवात केली. मुळातच भिल बंडखोरांची संख्या फार कमी होती. शिवाय तें बेसावध होते, त्यांच्याजवळ घोडे नव्हते आणि कित्येक जण पहिल्या फेरीतच जखमी झाले होते. ह्या उलट ब्रिटीशांजवळ सुसज्ज घोडदळ व पायदळही होते. पण भागोजी लढत राहीला. जेव्हां बंडखोर केवळ पंधरा जणच शिल्लक राहिले तेव्हा भागोजी व त्याचे साथीदार नदीच्या काठाने खाली सरकु लागले. सर्व बाजूंनी ब्रिटीश घोडेस्वारांनी त्याना वेढले होते, गोळयांचा पाऊस पडत होता शिवाय ते नदीच्या पात्रात खड्ड्यात होतें. ब्रिटीश आधिकाऱ्यांकडून त्यांना वारंवार शरण येण्याबद्दल सूचना दिल्या गेल्या, पण एक एक साथीदार मृत्यूमुखी पडत असूनही भागोजी शरण आला नाही. अखेर जेव्हा ते ५-६ भिल्ल शिल्लक राहिले तेव्हा त्यांना नदीच्या पात्रातून मोकळयांवर येण्याशिवाय पर्याय राहिला नाही. आणखी एक पर्याय. होता शरणागती स्विकारण्याचा.

पण जंगलातील हे वाघाचे बच्चे जीवाच्या भीतीने ब्रिटीशांना शरण जाण्यासाठी ह्या स्वातंत्र्ययुद्धात पडले नव्हते. ते पाच-सहा जण बाहेर आल्याबरोबर घोडेस्वारांनी त्यांच्यावर चोहोबाजूनी हल्ला केला. भागोजी व त्याचे साथीदार शेवट पर्यन्त लढत राहिले. ४९ भिल्ल बंडखोरांपैकी ४५ जणांनी आपल्या नेत्याबरोबर

भागोजीबरोबर ब्रिटीश साम्राज्यवादी सत्तेशी लढतांना प्राण ठेवले होते. ४९ मधील राहिलेले तीघे जबर जखमी होऊन पडले होते. भागोंजी मेला आणि १८५७ च्या स्वांतंत्र्य युद्धाची खऱ्या अर्थाने इतिश्री झाली. १८५७ च्या उज्वल लढयाचा शेवट संगमनेर जवळील जंगलात भागोजी व त्याच्या साथीदार भिल्लांनी केला.

त्या काळाचा इतिहास पाहिला तर असं वाटतं की, उत्तर भारतात भडकलेली स्वातंत्र्य लढयाची आग नर्मदेच्या किनाऱ्यावरच अडली, दक्षिणेकडे पसरलीच नाही. पुणे शांत राहिले, महाराष्ट्र, कर्नाटक शांत राहिला, पण हे खरे नाही. ही स्वातंत्र्य लढयाची आग नर्मदेच्या दक्षिणेला पेटती ठेवली आदिवासी जमातींनी, असंख्य आदिवासीं स्त्री, पुरुषांनी आपल्या प्राणांचे बलीदान करून हे सिध्द केले की अडाणी, भोळसट, गरीब वाटणाऱ्या आदिवासींमध्ये शक्तींमान शत्रुशी लढण्याची हिमत आहे, शौर्य, चिकाटी आहे आणि हुशारीही आहे.

१८५७ च्या स्वातंत्र्य युद्धानंतर १८५८ मध्ये अंबापाणीच्या लढाईत खाज्या नाईकची हार झाली. त्याच्या पुढील वर्षी भागोजी नाईक मारला गेला. भीमा नाईकाला ही ब्रिटीशांनी १८५९ मध्ये गाठले, त्याचे बरेच साथीदार मारले गेले, पण भीमा नाईक निसटला; १८६७ पर्यन्त तो ब्रिटीशांना त्रास देत राहिला. १८६७

मध्ये त्यांला ब्रिटीशानी पकडले आणि देशाबाहेर जन्मठेपेवर पाठवले.

१८१८ सालापासून किवा खरं तर त्याआधीपासूनच आदिवासीनी ब्रिटीश सत्तेला विरोध करावयास सुरवात केली होती. काही उच्च जातीच्या सरदारांच्या राजांच्या नेतृत्वाखाली ते लढले. पण बहुतेक वेळा ते स्वतःच्याच ताकदीवर विसंबून राहिले. सतत चाळीस वर्ष ते ब्रिटीश सत्तेला विरोध करीत राहिले. १८६० नंतर मात्र ब्रिटीश सत्तेला असलेला त्यांचा विरोध कमी झालेला दिसंतो. आदिवासींनी ब्रिटीश सत्तेला विरोध का केला आणि हा विरोध पुढे कमी का झाला, ह्याची कारणे ब्रिटीश राजवट आल्यानंतर येथील राजकीय सामाजिक परिस्थितीत जे बदल झाले त्यात मिळते. आपण पाहिले आहे की, ब्रिटीश येण्यापूर्वी जे हिन्दू किवा मुस्लीम राजे होते त्यांनी डोंगरदऱ्यांत, दाट जंगलात राहणांऱ्या आदिवासी जीवन पध्दतीला धक्का लावला नव्हता. ह्याचा अर्थ असा नव्हता की आदिवासीच्या भागात इतर लोक जातच नव्हते. बिगर आदिवासीं खानदेशात वस्ती करून होते, पण हे लोक सपाटीवर शेती करून गावे वसवून होते. ह्या गावांभोवती गावांची जंगले असायची. ह्यांच्यातून लोकांना गरजेपुरता चारा व लाकडे मिळायची, त्यामूळे मोठाल्या घनदाट जंगलाशी त्यांचा संबंध क्वचितच येथे असे. जंगलामधे औषधी, वनस्पती, फळे, इमारती

लाकूड इत्यादी वस्तू ते आदिवासीं कडूनच मिळवत असत. थोडक्यात ब्रिटीश येईपर्यंत डोंगर दऱ्यात, जंगलात राहणाऱ्या आदिवासीना त्यांचे जीवन त्यांच्या रीतीरीवाजाप्रमाणे, रुढीप्रमाणे जगता येत होते. ब्रिटीश आल्यावर परिस्थिती बदलायला लागली.

१८१८ साली ब्रिटीशांनी खानदेशचा ताबा घेतला तेव्हा खानदेशमध्ये सर्वत्र अशांतता होती, सवंत्र अंदाधुंदी होती हे आपण पाहिले. ही अंदाधुंदी कमी होवून काही वर्षांत थोडीफार शांतता प्रस्थापित झाली. पण खानदेशची एकूण लोकवस्ती फारच विरळ झाली होती. अनेक वर्षे ती तशीच राहिली. एकदा जी जमीन शेतीखाली होती, अशी हजारो एकर जमिन पडीत होती. तिच्यावर झुडपे वाढली होती. थोडीशी शांतता प्रस्थापित झाल्याबरोबर ब्रिटीशांनी ही सर्व जमिन लागवडी खाली यावी यासाठी प्रयत्न सुरु केले. खानदेशाबाहेरुन लोक येथे यावेत म्हणून त्यांनी प्रयत्न केले, येथे येवून शेती करणाऱ्यांना जमीन, शेतीच्या अवजारांसाठी, बैलासाठी पैशाची मदत देण्याच्या योजना त्यांनीं सुरु केल्या. ब्रिटींशाना त्यांच्या देशात चालणाऱ्या कापड गिरण्यांसाठी कापसाची गरज होती, शेती क्षेत्र वाढावे, शेतीतून निर्माण होणारा कच्चा माल आपल्या उद्योग-धंद्यांना नेता यावा. हाच त्यांचा उद्देश होता. त्यांनी रस्ते सुधारायला सुरवात केली. नवीन रस्ते टाकले, रेल्वे लाईन टाकली ह्या देशात जे जे मिळणे शक्य होते, त्याचा

व्यापार करून संपत्ती मिळवायला सुरुवात केली. त्यासाठी अफू सारख्या मादक द्रव्याचाही त्यांनी व्यापार केला. ह्याचसाठी त्यांनी जंगले तोडायला सुरुवात केली. १८५० नंतर खानदेशातील वस्तीही वाढायला लागली. बाहेरील लोक ह्या भांगात यायला लागले. झपाट्याने गावाजवळील जंगले नाहीशी व्हायला लागली, रेल्वेसाठीही जंगलांची तोड सुरु झाली, ह्या सर्वांचा परिणाम आदिवासींच्या जीवनावर होत होता. अगोदरच शिंदे, होळकर, पेशवे ह्यांच्या आपसातील लढायांनी व दुष्काळाने आदिवासींचे जीवन उध्वस्त झाले होते. ती जीवनाची घडी आदिवासी परत बसवूच शकले नाहीत. वाढत्या शेती विस्तारामुळे, जंगलांच्या नाशामुळे, सरकारने जंगले ताब्यात घेऊन आदिवासींचा जंगलोत्पादनावरील अधिकार नाकारल्याने आदिवासींना जीवन जगणे कठीण होऊ लागले.

त्यांची जीवनपद्धती तुटत होती, बिगर आदिवासी लोक त्यांच्या भागात, त्यांच्या गांवात शिरत होते. येथल्या जमिनी ताब्यात घेत होते. सरकार त्यांना जंगलातून बाहेर ढकलत होते. ह्या अशा परिस्थितीत आदिवासीनी ब्रिटीशांना विरोध केला ह्यात काही आश्चर्य नव्हते. खानदेशातील लोकवस्ती वाढत गेली तशी भिलांची परिस्थिती झपाट्यानं बदलत गेली. १८६० च्या सुमारास शहादे, तळोदे भागात गुजर पाटील आले. त्यांनीं येथे रिकाम्या

पडलेल्या जमिनी ताब्यात घेण्यास सुरवात केली. आदिवासी शेती करत. पण त्यांना जमिनीची भूक नव्हती, जमिनीतून, शेतीतून त्यांना पैसा कमवायचा नव्हता. पोराबाळांचे पोट भरण्या इतपत अन्नधान्य निघाले की त्यांचे समाधान होई. पण सरकारला असले शेतकरी काही कामाचे नव्हते. जे जास्तीत जास्त शेती पिकवतील, कापसारखे पिक काढतील, पैश्यासाठी शेतीतील माल व्यापाऱ्यांना विकतील असे शेतकरी सरकारला पाहिजे होते. गुजर पाटीलांनी बिगर आदिवासी शाहूनी जमिनी तर घेतल्या पण ह्या जमिनी कसण्यासाठी त्यांच्या जवळ पुरेशी मनुष्य शक्ती कठे होती? मग त्यांनी भिलांना शेतीवर सालदार म्हणून ठेवायला सुरुवात केली. पण त्यावेळी सालदारी करणारे, मजुरी करणारे आदिवासीही संख्येने कमी होते.

मालकाच्या जाचाला कंटाळून सालदार पळून जात. अशी नोकरी करण्यापेक्षा स्वतःच कूठे तरी शेती करावी असं आदिवासींना वाटणे साहजिकच होते. ह्या सालदारांनीं, आदिवासींनी शाहु मालकांच्या शेतावर राबावे म्हणून ब्रिटीश सरकारने कायदे केले, सालदारीचा करार केलेल्या सालदाराने करार मोडला तर त्याची संपत्ती मालकाला जप्त करता येत असे. जामीन राहिलेल्या माणसानां अटका होत असत. ब्रिटीशांनी केलेला कायदा हा शांहू मालकांच्या बाजूचा होताच. पण सरकारी

अधिकारीही त्यांच्याच बाजूचे होते. ह्यामुळे ह्या कायद्यांचा आधार घेऊन सालदारी करणाऱ्या आदिवासीवर सारख्या केसेस करून त्यांना त्रास दिला जात असें मुळामध्ये सालदारी करणाऱ्या आदिवासीची संख्या कमी असल्याने हा झगडा चालूच राहिला. पुढे परिस्थिती बदलली सरकारने हजारो एकर जंगल सरकारी मालकीचे राखीव म्हणून जाहीर केले, पहाडात, जंगलाच्या सानिध्यात राहणाऱ्या हजारो भिल्लांना आपली मुळची गांवे सोडून खाली यावे लागले. पण येथे तरी काय परिस्थिती होती. बहूतेक चांगली सुपीक जमिन बिगर आदिवासींच्या ताब्यात होती. काही आदिवासींनी राहिलेल्या कमी प्रतिच्या जमिनी घेऊन शेती करायला सुरवात केली. पण बाकीच्या आदिवासींना सालदारी करंण्या शिवाय जगण्याचा काही मार्गच राहिला नाही. शेतावर राबायला, कष्ट करायला हवे तेवढे आदिवांसी मजूर, शाहू लोकानां मिळू लांगले. ज्या भागात सुपीक जमिनी शाहू लोकांच्या तांब्यात होत्या व जेथे भूमिहीन आदिवासी शेतमजूर जास्त संख्येने होते, तेथे पाटील शेतमालक भरपर पैसा कमावू लागले, पोलीसांच्या मदतीने आदिवासीवर जरब ठेवून त्यांना गुलामासारखं राबवू लागले. काही भागातील जमिनी चांगल्या होत्या आणि आदिवासींच्या ताब्यांत होत्या अशा ठिकाणी सावकारांनी आपले पाश आदिवासी शेतकऱ्याभोवती आवळायला सुरुवात केली.

भोळया आदिवासीनां फसवून, कागदपत्रावर त्यांचे अंगठे घेवून, कायदयाची व पोलीसांची भिती दाखवून ह्या सावकारांनी त्यांना पिळायला सुरवात केली.

एक मात्र झाले की ज्या भागात आदिवासीच राजे होते, अश्या मेवाशी संस्थांनात सांवकारांची दादागिरी ब्रिटींश काळात तरी फार वाढली नाहीं, काठी, रायसिंगपूर, गंगथा, ताला इत्यादी आदिवासी राज्यांच्या संस्थानात आदिवासीं शेतकऱ्यांना थोडेफार संरक्षण मिळत राहिले, मात्र जेथे आदिवासी संस्थाने नव्हती. अशा भागात सावकारांची ताकद एवढी वाढली की त्यांनी आदिवासीवरच नव्हे तर इतर जातीच्या शाहू शेतकऱ्यांवर देखील अन्याय करायला सुरुवात केली. आणि ह्या सर्व ठिकाणी ब्रिटीशांचा कायदा व शासन नेहमीच सावकारांच्या बाजूने राहिले. शेतकरी नागवला जाऊ लागला, ह्या परिस्थितीवर प्रतिक्रिया होणं अटळ होतं. १८८० सालाच्या आसपास सावकारी विरुध्द लढे उमे राहीले, चळवळी उभ्या राहिल्या. ह्यातील एक अत्यन्त तेजस्वी लढा म्हणजे तंटया भिलांचा उठाव.

## तंट्या भील




तंटया भिल मध्यप्रदेशातींल खांडव्याजवळील पोखरा गावचा साधा भोळा आदिवासी, आपले तारुण्य त्याने इतर आदिवासी बांधवांसारखेच काढले. ह्या भागातील शाहू सावकारानी भिल शेतकऱ्यांवर फार अन्याय अत्याचार चालवले होते. लांड्या लबाड्या करून खोटे कागदपत्र करून पोलीसांची मदत घेऊन, भोळया आदिवासींची जागोजागी अडवणुक करून त्यांच्याकडून भरमसाठ व्याज घ्यायचे, आपल्या शेतांवर, घरी त्यांच्याकडून मोफत कष्ट करवून घ्यायचे, त्यांच्या जमिनी लाटायच्या, त्यांच्या स्रीयांवर अत्याचार करायचें हेच ह्या सावकारांचे धंदे होते. सावकारांच्या ह्या व्यवहारामुळे सर्वच गरीब जनता हवालदील झाली होती, परंतू गरीबांचा कोणीच वाली नव्हता. पोलीस, सरकारी अधिकारी, शिकलेली उच्च जातीय माणसे कोणाला ह्यांच्या यातनांकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता.

तंटया देखील इतराप्रमाणे ह्या परिस्थितीचा शिकार झाला, आणि जेव्हा हा अन्याय सहन करणे असह्य झाले तेव्हा तंट्या भिल दरोडेखोर झाला, आपल्या साथीदारांसह त्याने सावकारावर, अत्त्याचारी सेठांवर दरोडे घालायला सुरवात केली. तंट्या दोन वेळा पकडला गेला पण दोन्ही वेळी आपल्या साथीदारासह त्याने तुरुंगातून पळ काढला, सतत अकरा वर्षे त्याला पकडण्यासाठी उभारण्यात आलेल्या पोलीस दलाने, सरकारी ब्रिटीश अधिकाऱ्याने त्याला पकडण्यासाठी जंगजंग पछाडले, पण शूर, हुषार तंटया पोलीसांच्या हातावर तुऱ्या देत राहिला. आणि ह्याचे प्रमुख कारण म्हणजे तो गरिबांसाठी देव होता, अडचणीत सापडलेल्यांना मदत करणे हा त्याचा धंदा होता. गरिबांच्या मुलींची लग्ने लावून देण्यात त्याला समाधान मिळत होते.

अनेकांच्या सावकारांकडे गेलेल्या जमिनी त्याने परत मिळवून दिल्या होत्या. स्त्रीयांची तो फार इज्जत करत असे. स्त्रियांना त्रास देणाऱ्याची त्याला भंयकर चिड होती, तसेच आपल्या साथींदारावर त्याने खरे प्रेम केले, संकटात सापडलेल्या साथीदारांना सोडवून आणण्यासाठी स्वतःचा प्राण त्याने अनेकदा धोक्यात घातला. एक लंगोटी लावणारा अडाणी, दरोडेखोर त्याकाळात निमाड-माळवा भागातील गरीब जनतेच्या गळयातील तांईत झाला होता. तंट्या दिलदार होता. सूडबृद्धीने, कपटबृद्धीने वागणे त्याला माहीत नव्हते.

११ वर्षाच्या दरोडेखोरीच्या जीवनात त्याला अनेकांनी धोका दिला, पण माणसाच्या चांगुलपणावर, शब्दावर विश्वास टाकण्याचा त्याचा आदिवासींचा स्वभाव बदलला नाही. अखेर त्याचा मित्र म्हणवणाऱ्या गणपत रजपूत ह्याने त्याला धोक्यानं पकडून दिले आणि ब्रिटीश सरकारने त्याला जबलपूरच्या जेलमध्ये फांशी दिले. तंट्या बिरसा मुंडासारखा आपल्या मागे आदिवासीची ताकद उभी करु शकला नाही. परंतु ह्या भिल दरोडेखोराने आपल्या दिलदारपणाने निमाड आणि माळव्यातील जनतेचे असे प्रेम संपादन केले की तो मेल्यानंतर, अगदी आतापर्यन्त ह्या भागातील लोक त्याच्या शोर्यांच्या कहाण्या सांगत राहिले, त्याच्या औदार्याचे दाखले देत राहिले. त्याच्या जीवनावर पवाडे, गाणी गात राहिले.

१८८० ते १९०० च्या काळात सावकाराच्या जूलमाविरुध्द जागोजाग जो आवाज उठवला गेला त्यांची दखल सरकारांला निश्चितच घ्यावी लागली. १९०२ साली ब्रिटीशसरकारने कायदा करून बिगर आदिवासीनां आदिवासींची जमिन घेण्यास बंदी केली. पुण्यामुंबईच्या ऊच्च वर्गीय वर्तमानपत्रवाल्यांनीं, ह्यावर सरकार आदिवासी व शाहु असा भेद करून ह्या देशाच्या लोकात फूट पाडत आहे असा कांगावा केला. भिलांना आपल्या मालमत्तेची कशाही प्रकारे विल्हेवाट लावण्याचे स्वातंत्र्य असावे असा त्यांनी युक्तीवाद केला. ह्या युक्तीवादाचा अर्थ असा होता

की, सरकारने शाहु सावकारांना, सधनानां आदिवासींच्या जमिनी लुबाडण्याचा अधिकार द्यावा. ज्या भागात केवळ शाहू सावकार व आदिवासी शेतकरी असे संबंध होते, तेथे ह्या कायद्यामुळे फारसा फरक पडला नाही. कारण सावकारांना जमीनी ताब्यात घेऊन स्वतः कसण्यात काही रस नव्हता. त्यांच्यासाठी तर जमीनी आदिवासींच्याच ताब्यात असणे सोयीचे होते.

आदिवासीनी दिवस रात्र घाम गाळून, जमीनीतून पीक काढावे आणि सावकारांची कोठारे भरावी हेच त्यांना हवे होते. मात्र ज्याठिकाणी पैसा कमविण्यासाठी शेती करणारे शेतकरी होते, ज्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त जमीनीवर शेती करवून जास्तीत जास्त पैसा कमविण्याची हाव होती. अश्या ठिकाणी ह्या कायद्याने आदिवासीं शेतकऱ्यांना थोडे फार संरक्षण मिळाले. शहादे, तळोदे भागात १८६० च्या सुमारास आलेल्या गुजर पाटलामध्ये ही प्रवृत्ती होती. ह्या भागात कापसाची उत्तम शेती होत होती. भरपूर जमीन तांब्यात घ्यायची आदिवासींना सालदार म्हणून अल्प मोबदल्यात लावून त्याच्या श्रमाच्या बळावर भरपुर पीक काढून भरपूर पैसा कमावयाचा, हीच त्यांची सतत धडपड होती. आदिवासींना आधीं पैसे देवून त्यांना बांधून घ्यायचे. हिशेबात गडबड करून त्यांच्या डोक्यावर कर्जाचा बोजा दाखवून त्यांना बंधनात अडकवून ठेवायचे, ही त्यांची नेहमीचीच पध्दत होती. हया भागातील

बहुसंख्य भुमीहीन आदिवासींच्या असहाय्यतेचा फायदा घेवून सूदर पाटलांनी आदिवासींना गुलामासारखेच वागवले. वाटेल तशी शिवीगाळ, अपमान, मारहाण करून, आदिवासीं स्त्रियांवर अत्याचार करून त्यांनी आदिवासीची परिस्थिती फार दयनिय केली. ब्रिटीशांविरूद्ध लढणाऱ्या ब्रिटीशांच्या अन्यायाविरुध्द बोंब मारणाऱ्या, मानवतेचा, स्वातंत्र्याचा घोष करणाऱ्या उच्च जातीच्या विद्वानांना, पुढाऱ्यांना, नेत्यांना हा अन्याय दिसलाच नाही. ब्रिटीशांच्या गुलामीतून देशाला मुक्त करण्यासाठी धडपडणाऱ्या ह्या लोकांना आदिवासींची ही गुलामी दिसलीच नाही. पण तो त्यांचा दोष नव्हता. हे काही तेव्हाच घडत नव्हते, त्या आधी शतकानुशतके तेच घडत आले होते.

भारताच्या गेल्या दोन हजार वर्षांच्या इतिहासाकडे पांहिले तर असे दिसते की जातीय प्रथेवर, विषमतेवर आधारलेला नागरी समाज जसजसा पसरत गेला, तसतसा काही आदिवासी जमाती डोंगर दऱ्याकडे सरकल्या, नागरी समाजापासून दूर राहून त्यांनी आपले वेगळे अस्तित्व टिकवण्याचे प्रयत्न केले. पण हे होत असतानाच आदिवासींच्या लहान लहान जमाती ह्या नागरी समाजात समावेश होण्याची प्रक्रियाही चालूच होती. हिन्दु नागरी समाजाने आदिवासी जमातीला सामावून घेतांना समानतेच्या पायावर आपले म्हटले नाही, आपल्या समाज रचनेत ह्या जमातींना

खालच्या जातीचा दर्जा त्यांनी दिला. आजही अश्या खालच्या थरातील जातीसमूह दिसतात की जे समुह काही वर्षापूर्वीपर्यन्त जमाती होत्या. उच्च जातीय नांगरी समाजाने ह्या जमातींना गावाच्या वेशीबाहेर स्थान दिले. खरं तर नागरी समाजाने आदिवासींच्या संस्कृतीपासून भरपुर काही घेतले, आदिवासींच्या देवता, आदिवांसींच्या कलां, आदिवासींची वार, आदिवासींच्या कथा, पद्धती, आचार त्यांनी आपलेसे केले. मात्र आदिवासीच्यां माणसानां त्यांनी नीच जातीचे स्थान देवून दूरच ठेवले, शिवाय या जाती गायी खातात, हे अपवित्र आहेत, ह्यांच्या सवयी घाणेरड्या आहेत, हे आळशी आहेत, रानटी आहेत, चोर आहेत, ह्यांचे जीवन पशुसमान आहे, अशा तऱ्हेने त्यांना हिणवून त्यांनी नागरी समाजाजवळ आलेल्या व येवू पाहणाऱ्या जमातीनां नेहमीच तुच्छ लेखले. हयाचा परिणाम ह्या जमातीच्या व्यक्तींवर सुद्धा झाला. ह्या जाती-जमातीही स्वतःला हलक्या समजू लागल्या. एकीकडे ही अशी परिथिती व त्याच वेळीं, बिगर आदिवासी सधन शेतकऱ्यांचा, सरकारी अधिकाऱ्यांचा वाढता जाच ह्या स्थितीत रंजनपुरच्या गुला महाराजाचा उदय झाला.

## गुला महाराज व रामदास महाराज

गुला महाराजांचा जन्म तळोदे तालुक्यातील रंजनपुर ह्या गावातील एका गरीब मजूर आदिवांसींच्या घरी झाला. घरी कोणाला लिहितां वाचतां येत नव्हते, गुल्याला देखील कुणी शाळेत पाठविले नाही. हजारो आदिवासींना आरती चळवळीत खेचणारा गुल्या अखेरपर्यंत अशिक्षितच होता, गुल्याचे लग्न झाल्यावर काही वर्षे त्याने विहीरी खणण्याचे, ढोरक्याचे, जागल्याचे काम करून काढले. काही वर्षे मोरांबा ह्यां गावी सालदारी करून काढली ह्या काळात ह्या पतीपत्नीना झालेल्या आठ मुलातील सात मुले मरण पावली. शहादा तळोद्यातील इतर भूमीहींन शेतमजुर आदिवासीना जीवनात जे अनुभव येतात ते सर्व गुल्या घेत होता, परन्तु दारीद्रयाने गांजलेला गुल्या हा जिद्दीही होता. एखादीं गोष्ट त्यांच्या मनाने घेतली की त्यासाठी वाटेल ते करण्याची त्याची तयारी होती. कुकरमुंडयाच्या संतोजी महाराजाकडे त्याचे येणे जाणे होते. संतोजी महाराज पंढरपूरच्या यात्रेला निघाले तेव्हा त्यांने बरोबर जाण्याची इच्छा व्यक्त केली. पण संतोजी महाराजांनी नकार दिला. गुल्या महाराज एकटेच पंढपूरला जाऊन आले, एकदा नव्हे तर तीनदा.

गुल्या महाराजाने जे जीवन अनुभवले होते त्यात समाजातील उच्चनिचतेच्या भावनेची, विषमतेची झळ त्याला स्वतःला लागली होती. शाहू लोक आदिवासींना कसं वागवतात हे त्याने पाहिले होते, माणसा माणसामध्ये समानतेचे संबंध असावे, भेदाभेद नसावा, एकमेकांना त्यांनी सन्मान द्यावा, अशी इच्छा गुल्याच्या मनात होती. आपल्या बांधवांना शाहू लोक योग्य मान देत नाहीत आणि तो सन्मान मिळवायचा असेल तर आदिवासींनी आपल्या सवयीं सोडल्या पाहिजे, जंगलात राहतानां जे जीवन जगावे लागत होते त्यापेक्षा हे जीवन वेगळे असल्याने त्याप्रमाणे आपल्याला बदलले पाहिजे असं त्याला वाटत असे, आपल्या आपमुल धर्मांत त्याने आदिवासींना हेच शिकवण्याचा प्रयत्न केला. आपमुल धर्मात भक्ती मार्गाला महत्व होतेच. तरी पण गुल्या महाराजानी एखाद्या विशिष्ट देवाची पूजा करायला सांगितले नाही. त्यांच्या धर्मांत मूर्ती नव्हती, पुजारी नव्हते. आदिवासीनां इतर समांजाकडून मान पाहिजे असेल त्यांनी प्रथम एकमेकाला मान दिला पाहिजे, स्वत:लाही मान दिला पाहिजे. ह्या जाणीवेतूनच जणू महाराजानी आपल्या लोकांना एकमेकांत अभिवादन करण्याची नवी पद्धत दिली. आजही आपमुल धर्मवासी लोक एकमेकांना भेटतात तेव्हा आपले दोन्ही हात वर ऊंचावून 'आपकी जय 'असा पुकारा करतात. मग समोरचा माणूस स्त्री असो वा पुरुष असो. कुठल्या तरी

भूतकाळात होवून गेलेल्या पुरुषाच्या किंवा देवदेवताच्या नावाने एकमेकाला अभिवादन करण्याऐवजी एकमेकाची जय करण्याच्या पद्धतीने आदिवासींच्या मानसिकतेवर निश्चितच परिणाम केला असेल. ह्याशिवाय गुलामहाराजानी आदिवासीना स्वच्छतेने राहण्याचे सतत आवाहन केले. दारु, चोरी ह्याविरुद्ध महाराज सतत शिकवण देत राहिले. आदिवासींमध्ये स्त्रीपुरुषांचे नाते हे इतर शाहु समांजातील नात्यापेक्षा खूपच समातेनचे होते, स्त्रिया ह्यां स्वतंत्रपणे घराबाहेर वांवरत असत. रुढीवादीं शाहु समाजाचे लोक एकीकडे ह्या बाबत आदिवासींना दुषणे देत असत आणि दुसऱ्या बाजूने आदिवासी स्त्रीयांवर वाईट नजरही ठेवत असत. गुल्या महाराजने सांगितले की स्त्रियानी घरातील पुरुषाला मान दिला पाहिजे, त्याची पुजा केली पाहिजे; त्याला ईश्वराच्या जागी पाहिले पाहिजे. घराघरात स्त्रियांनी आपल्या पतीची रोज भारती करावी असे त्याने सांगितले, पण शेतकरी असलेली काही कुटुंबे सोडली तर ह्या पध्दतीचा आदिवासींनी अंगीकार केला नाही. मात्र ह्यातूनच सामुदायीक आरती सुरु झालो, हजारो आदिवासी एकत्र येवून सामुहिक प्रार्थना करत असत. गुल्या महाराज त्यांना उपदेश करत असे. हजारो लोक ठराविक दिवसानी आपले रोजचे काम सोडून जातपात लींगभेद न मानता एकत्र येत असत, एकमेकाची जय करून सन्मानाने वागवत असत. आरतीचा फार झपाट्याने प्रसार

झाला. ही सामूहिक आरती सुरु होण्यापूर्वी नळगव्हाणच्या एका काँग्रेस कार्यकर्त्याजवळ गुलामहाराजांनी फैजपुर कोंग्रेस आधिवेशनास जायची इच्छा व्यक्त केली होती. ह्या काँग्रेस कार्याकर्त्याने गुल्या महाराजाना बरोबर नेण्यास नकार दिला तरीही गुल्या महाराज फैजपूर काँग्रेसला जावून आलेच. येथें एक लक्षात घेतले पाहिजे, देशात त्यावेळी जनतेच्या स्वातंत्र्य लढ्याला गती आली होती. १९३५-४० चा हा काळ होता. कॉग्रेस अर्थातच ह्या संघर्षात अग्रभागी होती, परन्तु काँग्रेसच्या नेतृत्वाने, सतराव्या शतकात सतत पन्नास वर्षे ज्या आदिवासीं जमातीनी ब्रिटीशांशी सशस्त्र लढा दिला होता. त्या आदिवासीनां स्वातंत्र्यलढयात सहभागी करण्याचा प्रयत्न केला नाहीं. समाजामध्ये ज्यांचे स्थान खालच्या पातळीवर होते, अशा जातीनां आदिवासी जमातीना स्वातंत्र्यलढयात खऱ्या अर्थाने सहभागी करून घेणे हे उच्च जातीच्या नेत्यांना जमलेच नाही. १९३८ साली गुल्या महाराजांचा मृत्यू झाला.

मरण्यापूर्वी त्यांनी आपली ही चळवळ चालवण्याचे आधिकार आपल्या भावाच्या रामदासमहाराजांच्या हाती सोपवले. गुल्या महाराजांच्या मृत्यूनंतर सामुहीक आरतीला येणाऱ्यांची संस्था वाढू लागली. १९४० च्या सुमारास तर ह्या सामुहीक आरत्यामध्ये खानदेशातील दूर दुरच्या भागातून हजारो लोक येत

असत. १९४० च्या सुमारास गुल्या महाराजांच्या ह्या चळवळीचे दृश्य परिणाम दिसायला लागले. हजारोच्या संखेने एकत्र येणाऱ्या ह्या सालदार शेतभजूर आपल्या शक्तीची जाणिव व्हायला लागली. त्यांच्यातील आत्मसन्मानाची भावना वाढीस लागली. सधन शेतकऱ्यांना हे जाणवू लागले. वाटेल तो आत्याचार सहन करून दिवस रात्र राबणाऱ्या आदिवासींत जागृती होत आहे, हे त्यानां कस आवडणार होते? त्यानी आरतीला विरोध करावयास सुरवात केली. जो आरतीला जाईल त्यांला पन्नास रुपये दंड व त्यांचे मुंडन करण्याची सजा दिली जाईल अशा धमक्या काही गावात दिल्या गेल्या. ह्यातूनच सधन गुजर शेतकऱ्यातील व आदिवासीं भिल मजूरातील संघर्ष पुढे आला, गुल्या महाराजांपेक्षा रामदास महाराज जास्त राजकिय आणि लढावू प्रवृत्तीचा होते. कोंग्रेस पक्षातील एक वरीष्ठ नेते शंकरराव दवे आरती कार्यक्रमात येवून गेले, स्थानीक सधन शेतकऱ्यांच्या तक्रारी येवू लागल्या आणि आरतीला दूरद्रचे लोक येवू लागले, तेव्हा ब्रिटीश सरकारलाही आरती चळवळीत असलेल्या धोक्याची जाणिव व्हायला लागली.

ह्या अशा परिस्थितीत एक असा प्रसंग असा झाला की ज्यांमुळे आदिवासी व शासन ह्यांच्यात संघर्ष आला. आरतीला जाणाऱ्या काही आदिवासीं स्रियांपैकी एकीला, कट्यारे नावाच्या फॉरेस्ट गार्डने घोडयावरुन जातांना धक्का देवून जखमी केले.

रामदास महाराज त्यावेळी चिचाळे येथे होते. खबर लागताच, बेहोश आणि रक्तबंबाळ झालेल्या बाईला उपचार करून रामदास महाराज अनेक स्त्रीपुरुषांसह कट्यारेकडे गेले. कट्यारेने आपली चूक कबूल करून माफी मागण्यांचे तर सोडलेच उलट त्याने आदिवासींवरच केस करण्याची धमकी दिली. रामदास महाराज पोलीस अधिकाऱ्याकडे गेले पण नेहमीप्रमाणे पोलीसांनी काहीही केले नाही. मधल्या काळांत जखमी झालेली गिरजाबाई मरण पावली. ह्यानंतर मात्र संतप्त आदिवासी स्त्रिया कट्यारेच्या घरी गेल्या, त्यांनी फॉरेस्ट गार्डला घराबाहेर खेचले आणि त्यांची चांगली पिटाई केली. कट्यारेने यांबाबत आदिवासीं स्त्रियांवर पोलीसात केस दाखल केली. ह्या केसवर  मात्र पोलीसांनी ताबडतोब हालचाल केली, कलेक्टरने कट्यारे व रामदास महाराज दोघांना बोलावून घेतले. रामदास महाराजांनी आपली केस मागे घ्यावी, कटयारेही केस मागे घेईल हे प्रकरण मिटवावे, अशी कलेक्टरने महाराजांना गळ घातली. महाराजांनी ते मान्य केलें. त्यांनी केस मागे घेतली. पण काही दिवसांनी कलेक्टरचे त्यांना पत्र आले की“ पोलीस अधिकारी आदिवासींवरील केस मागे घेण्यास तयार नाहीत. १८ स्त्रिया ६ पुरुषांना अटक झाली. कलेक्टरने सरळ सरळ आदिवासींना विश्‍वासात घेवून धोका दिला होता. पण त्यात काही आश्‍चर्य नव्हते. सरकारी अधिकारीं, पोलीस अधिकारी हे

नेहमीच आदिवासींवर अत्याचार करणाऱ्या शाहुंच्या साह्याला धावून येतात. आपल्या अधिकाराचा उपयोंग सधनांसाठी करतात हा आदिवासींचा अनुभव होता आणि आजही आहे. व्यारा येथे ह्या आदिवासी स्रियांवरील केस सुरु झांली, तेव्हां शेकडो आदिवासी स्त्री पुरुष तारखांच्या दिवशी कोर्टात यावयास सुरवात झाली. २३ एप्रील १९४१ ला नवापूर कोर्टातही केस चालणार होती. त्यावेळी शेकडो आदिवासी तेथे जमा झाले. पोलीसही प्रचंड संख्येने हजर होते. सर्व आवार पोलीसांनी भरुन गेले होते. कलेक्टर स्वत: जीपमध्ये कोर्टाच्या आवारात फिरत होता, पोलीसांनी नेहमीच्या संवयीप्रमाणे दंडुकेबाजी, शिवीगाळ यांचा उपयोग केला, आणि आदिवासीच्यां मनात खदखदत असलेला संताप ऊफाळून आला आणि गणपंतसिंग नांवाच्या आदिवासीने एक दगड कलेक्टरच्या दिशेने फिरकांवला. दगड कलेक्टरला वर्मी बसला. पोलीसांची धामधूम सुरु झाली, ते गणपतला पकडायला धावले पण गणपत भोवती आदिवासीनी वेढा घातला. पोलीसांना त्यावेळी गणपतला अटक करतां आली नाही. काही दिवसानंतर गणपतसिंग व रंजनपूरचे गजानन दवे ह्यानां अटक झालीं, केस चालली, न्याय झाला आणि दोघानांही शिक्षा ठोठावण्यात आली. कटूयारेने फॉरेस्ट गार्डने केलेल्या केसमध्येही आदिवासींनाच शिक्षा झाली.

प्रतांपपुरच्या राणाचा आरती चळवळीला विरोध होता. आदिवासीत जागृत होणारा स्वाभीमान व वाढती ताकद त्याला सहन होत नव्हती. शिवाय पोलीसांशी त्यांचे आतून संबंधही होते. रामदास महाराजांना घरी बोलावून त्याने ह्याचा परिणाम योग्य होणार नाही अशी धमकी दिली, नोव्हे. ४१ मध्ये आरतीला बंदी घालण्यात आली. रंजनपूरला बंदुकधारी पोलीस ठेवण्यात आले. जो कोणी आरतीला येईल त्याला एक वर्षाची शिक्षा ठोठावण्यात येईल अशी अफवा पसरविण्यात आली. गुल्या महाराजांच्या समाधीजवळ जो येईल त्याला गोळी घाला, असा हुकूम पोलीसांना देण्यात आला आहे अशी बातमी पसरविण्यात आली. भितीचे वातावरण पसरवण्यात अर्थातच प्रतापपूरच्या राजासोबतच खेड्याखेडयातील सधन शाहू शेतमालक पुढे होते.

१९४२ च्या मे महिन्यात रामदास महाराजानां हद्दपार करण्यात आले. रामदास महाराज सातपुड्यापलिकडील होळकरांच्या राज्यात गेले. तेव्हा त्यांच्याबरोबर आदिवासींची चौतीस कुटुंबे आपल्या जमिनी घरे सोडून बरोबर गेली. आरती बंद पडली. रामदास महाराज हद्दपार झाले. सधन गुजर शेंतमालक खूष झाले पण ते गप्प बसले नाहीत. रामदास महाराजांवर अनेक खरेखोटे

आरोप करून त्यांनी महाराजाना बदनाम करण्याची मोहींम चालू ठेवली. चले जांव चळवळ ह्यावेळी जोरात होती. काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यानी रामदास महाराजांनी पक्षात यावे म्हणून प्रयत्न चालवले होते  परन्तु नंदुरबारचे काही सधन शेतमालकांचे प्रतिनिधी, सतत रामदास महाराजाची बदनामी करत होते. रामदास महाराज आणि त्याचबरोबर लढावू प्रवृत्तीचे आदिवासी स्वातंत्र्य लढ्यापासून दूरच राहावेत असं ह्या सधन शेतमालकांना वाटत होते. पण आता रामदास महाराज ब्रिटीश शासनाच्या विरोधात गेले होते. त्यांच्यामागे आदिवासी समाज उभा होता. धुळयाचे काँग्रेस पक्षाचे एक कार्येकतं श्री. शंकर विनायक ठाकर हे होळकर राज्यात जाऊन रामदास महाराजानां भेटले. हृहपारीची मुदत पुरी व्हायची वाट न पहाता रामदास महाराजांनी आपल्या भागात परतावे आणि साम्राज्यवाद विरोधी संघर्षात सामील व्हावे असे त्यांनी रामदास महाराजांना सांगितले.

काही दिवसांनी. रामदास महाराज आपल्या अनुयायासह नर्मदा पार करून अक्राणी भागातून खानदेशात यावयास निघाले. येतानां गांवोगावच्या आदिवासींशी ते बोलत होते, त्यांना राजकारण सांगत होते. कुणातरी सधन शेतमालकाने रामदास महाराज येत असल्याची बातमी पोलीस अधिकाऱ्यानां दिली, सशस्त्र पोलीसांनी रात्रीच्या अंधारात सातपुड्यातील आंबापाणी-

रावळपाणी हया गांवी मुक्काम केलेल्या रामदास महाराजांच्या माणसांना चोहो बाजूनी घेरलं. जेव्हा सूर्य उगवला, रामदास महाराज व त्यांचे साथीदार उठून पुढच्या प्रवासाच्या तयारीला लागले. पोलीसांनी चोहोबाजूनी गोळ्यांचा वर्षांव केला. मात्र रामदास महाराजांना इजा होऊ नये अशीं काळजी त्यांनी घेतली. जखमी झालेले स्त्री पुरुष दवाखान्यापर्यन्त पोचण्याआधीच वाटेत मृत्यू पावले. रामदास महाराज व इतर चाळीस जणांवर धुळयाला केस चालली, ह्या लोकांना एक वर्षे कैदेची शिक्षा झाली. रामदास महाराजांना सोडण्यात आले तरी आदिवासी वरील दडपशाही तशीच चालू राहिली आरती वरील बंदी चालू राहिली. रंजनपुरला गुल्या महाराजांच्या समाधीवर बंदुकधारी पोलीसांचा पहारा कायम राहिला. पोलीसांच्या मदतीने सधन शेतमालक आदिवासींना सतत जरबेत ठेवत राहिले, जी ३६ कुटुंबे रामदास महाराजांबरोबर गेली होती त्यांच्या जमिनीवर वनखात्याने कब्जा केला. मधल्या काळात दुसरे महायुद्ध संपले होते, ब्रिटीशांची आपल्या साम्राज्यावरील पकड ढिली पडली होती. साम्राज्यवादाविरोधी संघर्ष तीव्र होवून, गुलाम देश स्वतंत्र होत होते.

भारतावरील ब्रिटीश सत्ता आता काही काळापुरतीच अशी जाणिव ब्रिटीशांना आणि भारतीयांना व्हायला लागली होती. रामदास महाराज व त्यांचे गुजरात मधील गुरुबंधु केसरसिंग

महाराज हे दोघे एकत्र आले. ब्रिटीश सत्तेविरोधी त्यांनी संयुक्त प्रयत्न सुरु केले. हे त्यांचे संबंध स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कायम राहिले, १९४६ मध्ये आरतीवरींल बंदी उठवण्यात आली. पण आरतीला पुर्वीचा जोर परत कधी आला नाही, जातीभेद व विषमता ह्यावर आधारीत ह्या देशाच्या समाजातील तथाकथीत खालच्या जातीच्या नेत्यासमोर जी समस्या आली होती, तीच रामदास महाराज व केसरसिंग ह्यांनाही सतावत होती असे दिसते. समाजातील खालच्या स्तरातील लोकांना सामजिक आणि आर्थिक दृष्ट्या अवमानाचे जीवन जगावे लागत होते. ह्याबद्दल त्यांच्या मनात असंतोष होताच. समाजातील वरिष्ठ जाती रोजच्या व्यवहारात हया जातीना सातत्याने त्यांच्या कनिष्ठत्वाची जाणिव करून देत होत्याच शिवाय उच्चनिचतेचे नाते कायम ठेवण्याचाही सतत जागरुकपणे प्रयत्न करीत होत्या. ह्या वरिष्ठ जातीचे सामाजिक आर्थिक वर्चस्व झुगारुन देणे ही आपल्या समाजाची गरज जशी ह्या नेत्यांना जाणवत होती. त्याचप्रमाणे देशाला राजकीय गुलामगिरीतून स्वतंत्र केले पाहिजे, ही भावनाही तथाकथित कनिष्ठ जातीजमातीच्या नेत्यांच्या मनात होती. रामदास महाराज व केसरसिंग महाराज यांनी ब्रिटीश सत्तेला विरोध केलाच पण

त्याचवेळी आदिवासींना, बिगर आदिवासीं समाजात सन्मानाने जगता येणार नाही, त्यासांठी ह्या भूमींवर त्यांचा मुळातून हक्क आहे अश्या आदिवासींना स्वतंत्र राज्य दिले पाहिजे. अशी त्यांनी मांडणी केली. १९५४ मधील एका घटनेत पोलींसांनी आदिवासींवर गोळीबार केंला, केसरसिंग व रामदास महाराज यांना अटक करण्यात आली, केसचा निकाल लागेपर्यन्त जवळ जवळ एक वर्षं त्यांना जळगाव येथे जेलमध्ये ठेवण्यात आले. रामदास महाराज परत आले तेव्हा महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने जोर धरला होता. ह्या भागात त्यावेळी उकाई धरणाखाली ज्या हजारो आदिवासींच्या जमिनी जाणार होत्या त्या आदिवासींच्या प्रश्तावर आंदोलन मूळ धरत होते. रामदाध महाराजांनी ह्या आंदोलतात कम्यूनिष्टांना साथ दिली. आणि मुंबईला विधान सभेवरील मोर्च्यांत मोठ्या संख्येने आदिवासींना घेऊन सामील झाले. १८६० मध्ये रामदास महाराज अर्धांगवायूचा झटका येवून मरण पावले.

१९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला. ब्रिटीश परत गेले. भारतातील राजेरजवाड्यांची सत्ता संपुष्टात आली, संस्थाने खालसा झांली, देशात प्रजासत्ताक राज्य आले. आदिवासींना शैक्षणिक सवलती देवून, आर्थिक सहाय्य देवून, त्यांच्यासाठी खास योजना आखून त्यांचे स्थान ऊंचावण्याचे प्रयत्न शासकिय

यंत्रणेमाफेत सुरु झाले खरे, पण समाजातील उच्च जातीतील लोकांना तथाकथित खालच्या जातींच्या लोकांना सन्मानाने वांगवणे, समानतेने वागवणे पटत नव्हते. शतकानुशतके उच्चनिचतेचे जे संस्कार येथील माणसांच्या मनांवर झाले होते ते सहजपणे साफ होणे कठीण होते. हे विषमतेचे संबंध आपल्या देशाच्या धार्मिक आचाराविचारात, सामाजिक चालीरीतीत घट्ट बांधले गेले होते. शिवाय परत ह्या देशात तशीच जाती प्रथेवरील आधारींत समाज रचना उभी करण्याचे स्वप्न काही उच्च जातीचे व रुढीवादी लोक पहात होते. भारताच्या लोकशाही राजकीय यंत्रणेतही काही काळ अशा जुनाट रुढीवादी विचारांच्या लोकांचा प्रभाव होता. ह्या सर्व परिस्थितीमुळे आदिवासींना राजकीय दृष्ट्या इतराप्रमाणेच नागरीकत्वाचा हक्क मिळाला असला तरी समाजातील त्यांचे स्थान फारसे बदलले नाही. येथील सधन शेतमालकांनी नवीन शासन यंत्रणेशी संबंध जुळवले, पोलीस यंत्रणेचा उपयोग करायचे तंत्र त्यांनी आत्मसात केले आणि आदिवासींचा सामाजीक दर्जा उंचावू नये, त्यांची आर्थिक स्थिती सुधारु नये, असेच प्रयत्न ते करत राहिले. कारण स्पष्ट होते, आदिवासींची परिस्थिती सुधारली, तो सन्मानाने जगण्यांची कोशीश करु लागला तर आपल्या स्थानाला धक्का पोचेल हे त्यांना माहित होते. नोकरशाहीत देखील त्यावेळी प्रामुख्याने

आधिकारी व नोकरवर्ग उच्च जातीचाच असल्याने खालच्या जातीवरील वर्चस्व कायम ठेवणे त्यानां अवघड नव्हते. आणि आदिवासी जमाती तर समाजाच्या कांठांवरील समूह होते. ब्रिटीशांनी आदिवासींना गुन्हेगार जमातीचा किताब दिला होता; समाजातील विद्वानांनी आदिवासींना आळशी, चोरटे ठरवले होते. आणि आदिवासी अजूनही, अडाणी, अशिक्षित, भोळया स्वभावाचे होते. भारत स्वतंत्र झाल्यावरही आदिवासी समाजाचे शोषण कमी झाले नाही, कायद्यातील पळवाटांचा उपयोग करून आदिवासींच्या जमिनी घश्यात घालणाऱ्या सावकार-सधन शेतमालकांच्या उद्योगातही खंड पडला नाही.

## अंबरदादा सुरतवंती

गुल्या महाराज, रामदास महाराज, केसरसिंग ह्यांच्या चळवळीमुळे देशातील एकूण बदललेल्या वातावरणामुळे आदिवासी समूह ह्या बिगरआदिवासींच्या अन्याय्य परिस्थिती विरुद्ध हलू लागले होते. सधन शेतमालकांनी पीक संरक्षण सोसायट्या स्थापन करून खाजगी फौजेच्या साह्याने आदिवासींच्या असंतोषाला दडपून ठेवण्याचे प्रयत्न चालवले होते, कायदा व पोलीस यंत्रणा तर सधनांना साथ द्यायला सज्जच होती. ह्या अशा काळात अंबरसिंग मोठा होत होता, अंबरसिंगाचा जन्म १९४० चा. म्हणजे उकाई धरणग्रस्तांच्या आंदोलनाच्या वेळीस तो तारुण्याच्या सीमेवर उभा होता. अंबरसिंग पाडळद्याच्या वन्याबाबा ह्या आदिवासी शेतमजुराचा मुलगा. वन्याबाबाने गुल्या महाराजाचे शिष्यत्व कधी पत्करले नाही, पण गुल्या महाराज व रामदास महाराज ह्यांचा प्रभाव पाडळदे गांवावर निश्चितच होता. आपल्या मुलाला शिक्षण द्यायचा निर्णय वनाबाबाने घेतला. रामदास महाराज मरण्याच्या आधीच कांही काळ ह्या भागात श्री. सौन्दणकरानी आणि रीपब्लीकन पक्षाने जी जमीन बळकांवची चळवळ केली होती. त्यातही अनेक आदिवासीं सहभागी झाले

होते, ह्या चळवळीतून फारसे काही साधले नाही. सौन्दणकरांनी वैयक्तीक सत्तेच्या अभिलाषेपोटी चळवळ मधेच थाबवली. पण आदिवासींनी ह्या लढ्यात महाराष्ट्रातील इतर श्रमिक दलित लोकांच्या संघर्षात भाग घेतला ही गोष्ट महत्वाची आहे. धुरखेड्याला ह्या जमीन बळकांव आंदोलनात काही आदिवासी गुजर शेतमालकाच्या ताब्यात असलेल्या शेतात घुसले. त्यांनी कापूस वेचायला सुरवात केली. ह्यावेळी काही गुजर लोक हातात बंदुका घेऊन घोड्यावरुन तेथे आले व त्यांनी आदिवासींवर गोळीबार केला.

असं सांगतात की दहा आदिवासी ह्यात मरण पावले. त्यानंतर आदिवासीनीही प्रत्युत्तर द्यायचा प्रयत्न केला. दंगल झांली, केसेस झाल्या. काही गुजर शेतमालकांना शिक्षाही झाली. आदिवासी व बिगर आदिवासी ह्यांच्यातील ताणतणाव मुख्यतः हा सधन गुजर शेतकरी व आदिवासी सालदार व शेतमजूर ह्या संबंधातील होता. ह्यावेळी अंबरसिंग शिकत होता. १९६२ मध्ये शिक्षण झाल्यावर त्यांने सर्वोदय मंडळात काही वर्षे नोकरी केलीं. पण आजूबाजूला घडणाऱ्या घटनांची त्याला जाणीव होती, आदिवासी स्त्री पुरुषांवर होणाऱ्या अत्याचाराने त्याचे मन जळत होते. सर्वोदयशी असलेल्या संबंधामुळे ह्या देशात काय होत आहे ह्याचे ज्ञान त्याला होत होतेच, पण शाहू समाजातील वेगवेगळया नेत्यांनाही तो

जवळून पहात होता. देशातील वेगवेगळया राजकीय विचार प्रवाहांशी त्याला ओळख होत होतो. पुढे सहा वर्षे तो सर्वोदय मंडळाबरोबर होता. पण सधन शेतमालक व शासकीय यंत्रणा ह्या दोन्हीमध्ये भरडल्या जाणाऱ्या आदिवासींच्या यातना त्याला सतत टोचत होत्या. १९६८ साली सर्वोदय मंडळातून तो बाहेर पडला. शहादा येथे त्याने भील सेवा मंडळ स्थापन केले. भजने म्हणत, लोकांना संघटीत हेण्याचा, ताठ मानेने जगण्याचा, अन्यायापुढे मान न झुकवण्याचा संदेश देत तो फिरु लागला. त्याचवेळी आदिवांसींच्या तक्रारी शासनाकडे नेवून त्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्नही त्याने सुरु केले. पोलीसांनी त्याच्यावर खोटया केसेस दाखल केल्या. सधन शेतमालकांनी त्याला बदनाम करण्याचे प्रयत्न केले. त्याला विकत घ्यायचेही प्रयत्न केले, दडपण्याचेही प्रयत्न केले. परंतु अंबरसिंगला आपल्या लोकांची स्थिती माहित होती, आपल्या लोकांवर होणारे अत्याचार माहित होते आणि आपल्या लोकांची शक्तीही त्याला माहीत होती. आपल्याला काय साधायचे आहे ह्याची त्याला स्पष्ट जाणीव होती. पहिल्या काही वर्षात महाराज म्हणून आदिवासी स्त्री पुरुष त्याला भक्तीभावाने ओवाळत असत, त्याच्या पाया पडत असत. त्यावेळी त्याने ह्याला काही विरोध केला नाही. पण पाटीलवाडीची घटना झाल्यावर त्याच्याभोवती


जेव्हां आदिवासी तरुण जमा होऊ लागले, जेव्हां बाहेरुन आलेल्या शिकलेल्या तरुणांनी त्याला साथ द्यायला सुरवात केली, जेव्हा लोकांची चळवळ उभी राह्यला लागली, त्याने लोकांकडून ओवाळून घेण्याची पद्धत बंद केली. अंबरसिंग महाराजाचे लोकानां प्रिय असलेल्या अंबरदादाचे नेतृत्व दुर्दैवाने आदिवासींना जास्त दिवस लाभले नाही. किडनीच्या रोगाने अंबरसिग पुण्याच्या हॉस्पीटलमध्ये तरुण वयातच मरण पावला. अंबरसिंग असतांना ग्राम स्वराज्य समिती आणि नंतर श्रमिक संघटनानी अंबरसिंगच्या नेतृत्वात आणि तों गेल्यावर श्रमिक संघटनेच्या झेंडयाखाली आदिवासींनी अन्याय अत्याचाराविरुध्द दिलेल्या संघर्षांचा इतिहास अजूनही ताजा आहे. अंबरसिंगाचे चरीत्र व हा इतिहास स्वतंत्रपणे सविस्तर लिहिण्याची गरज आहे.

हे मात्र निश्चित की अंबरसिंग हां खाज्या नाईकापासून सुरु झालेल्या आदिवासींना प्रभावी नेतृत्व देणाऱ्या नेत्यांच्या मालिकेतील शेवटचा हिरा होता. आदिवासीं, खानदेशातील भिलांचा इतिहास हा असा दैदिप्यमान आहे. आपल्या जमातीत ज्यांच्या आठवणींनी छाती भरुन यावी, मान गर्वाने ताठ व्हावी ज्यांच्यापुढे आदराने मस्तक झुकावे, असे दैदिप्यमान तारे होऊन गेले आहेत. शाहू लोकांनी ह्या इतिहासाकडे दुलंक्ष करण्याची कोशिश केली. | हा इतिहास पुसण्याचा प्रयत्न केला तरी हे शक्य

झाले नाहीं, होणांर नाही. भारतीय इतिहासात जातीभेद, उच्चनिचता ह्या पायावर उभ्या राहिलेल्या समाजात सम्मिलीत होतांना जमातीनां कनिष्ठ जातीचे रूप घ्यावे लागत होते. आज मानवतेच्या व समानतेच्या पायावर नवीन आकार घेणाऱ्या भारतीय समाजात समान पातळीवर, सन्मानाने आदिवासी जमातीनां सहभागी होता येईल अशी परिस्थिती निर्माण होत आहे. आत्मसन्मान ठेवून, उन्नत मस्तकानेच, आदिवासी जमातींनी भारतीय समाजात सहभागी झाले पाहिजे. कुठल्याही तऱ्हेचे कनिष्ठ स्थान अमान्य करून सन्मानाने ह्या समाजात सहभागी होण्याचे ठरवूनच आदिवासी नवीन भारतीय समाज घडवण्यात हातभार लाव शकतील. आपण आदिवासी भिल जमातींचे आहोत, असा अभिमान प्रत्येकाने ठेवलाच पाहिजे. पण ह्या जमातीला असा अभिमान वाटावा म्हणून आपल्या समाजासांठी निस्वार्थी, निडर, त्यागी असे जीवन जगण्याची, प्रसंगी विरोधी शक्ती विरुद्ध टक्करण्याची तयारी ठेवणारे युवकही निर्माण झाले पाहिजेत. आदिवासीं भिलांचा इतिहास तेजस्वी आहे. भविष्यही तसेच तेजस्वी करायचे असेल तर आजच सुरुवात करायला पाहिजे.

दिनानाथ मनोहर यांची ई साहित्यतर्फ़े प्रकाशित पुस्तके

कृपया कवरवर एकदाच क्लिक/टॅप करा. पुस्तक उघडेल.






**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**
**दिनानाथ मनोहर यांचे हे तिसरे पुस्तक.**

दिनानाथ मनोहर हे मराठी साहित्यातील एक सुप्रसिद्द नाव. १९७५ साली त्यांची पहिली कादंबरी प्रकाशित झाली त्याआधीपासून ते लिहीत आहेत. त्यांची अनेक पुस्तके विविध भारदस्त प्रकाशनगृहांतर्फ़े प्रकाशित झाली आहेत. नवीन लेखकांना ते मार्गदर्शन करतात. तसेच सातपुड्यातील आदिवासी भागात त्यांचे कार्य गेली पन्नासेक वर्षे सुरू आहे. त्यांच्या पुस्तकांना विविध प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु तरूण वाचकांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने ते काही पुस्तके ई साहित्यकडे प्रकाशनासाठी देतात.

दिनानाथ मनोहर यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(३ पुस्तके), शंभू गणपुले (९ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१८ पुस्तके), शुभांगी पासेबंद (९ पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२८ पुस्तके), अनील वाकणकर (९), अनंत पावसकर(४ ), मधू शिरगांवकर

(७), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(८), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ(भगवद्गीता) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।